वर्ष ५७ वे । अंक ३४२ वा । पाने ६ । किंमत २ रूपये

दैनिक सत्यप्रभा

बातम्यांसोबत विचार देणारे

मंगळवार, दि. १ जुलै २०२५

PR No. G-2/RNP/NND-251/2024-2026

epaper.satyaprabha.com

dainiksatyaprabha2015@gmail.com



**वसंतराव नाईक यांची आज जयंती**

हरित क्रांतीचे प्रणेते आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची आज जयंती. त्यांची जयंती राज्यात कृषी दिन म्हणून साजरी केली जाते. त्यानिमित्त त्यांच्या पवित्र स्मृतीला **विनम्र अभिवादन!**

*__नवी दिल्ली :__ पंतप्रधान नरेंद्र मोदींनी त्यांचा दर महिन्याला होणारा मन की बात हा कार्यक्रम मराठीतून शेअर केला आहे. विशेष म्हणजे हा संपूर्ण ३२ मिनिटांचा कार्यक्रम पंतप्रधानांच्या आवाजात करण्यात आला आहे. अधिकृत सोशल मीडिया अकाऊंटवरून हा कार्यक्रम शेअर करण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मन की बात कार्यक्रम आता मराठीत त्यांच्याच आवाजात ऐकायला विसरू नका, असे या पोस्टमध्ये म्हटले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही पोस्ट रीशेअर करुन आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाजात मराठीमध्ये मन की बात, असे आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. रविवारी (दि. २९) या कार्यक्रमाचा १२३ वा भाग प्रसारित झाला आहे.*

## संक्षिप्त

### आ. टी राजासिंह यांची भाजपाला सोडचिठ्ठी

**हैदराबाद :** तेलंगाणातील भाजपाचे आक्रमक आमदार अशी ओळख असलेल्या टी राजासिंह यांनी भाजपाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. टी राजासिंह हे गोशामहाल मतदारसंघाचे आमदार आहेत. भाजपाने प्रदेशाध्यक्षपदी एन. रामचंद्र राव यांच्या नावावर शिक्कामोर्तब केल्याने नाराज झालेले टी राजासिंह यांनी राजीनामा दिला. आपण भाजपापासून वेगळे होण्याचा निर्णय घेतला असला तरी हिंदुत्त्वाच्या विचारधारेशी असलेली बांधिलकी कायम जपणार असल्याचे म्हटले आहे. टी राजासिंह हे आक्रमकपणे हिंदुत्वाची बाजू मांडणारे नेते म्हणून ओळखले जातात.

### ना. छगन भुजबळांबाबत आक्षेपार्ह पोस्ट व्हायरल

**मुंबई :** अन्न, नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या निधनाची खोटी बातमी एका बनावट व्हिडिओद्वारे सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आली होती. या व्हिडिओमध्ये एका नामांकित टीव्ही चॅनेलचा बनावट लोगो वापरण्यात आल्याने राज्यात मोठी खळबळ उडाली. या खोट्या माहितीच्या प्रसारामुळे नाशिक सायबर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोशल मीडियावर अशा प्रकारे दिशाभूल करणारी आणि खळबळजनक माहिती पसरवल्याबद्दल पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे.

### मुंबई मनपा काँग्रेसची समन्वय समिती बदलली

**मुंबई :** मुंबई काँग्रेसने अलीकडेच महापालिका निवडणुकीसाठी एक समन्वय समिती तयार केली होती. मात्र, आज या समितीत बदल करण्यात आले आहेत. चंद्रकांत हांडोरे, नसीम खान आणि भाई जगताप यांच्या नावांचा समावेश या यादीत करण्यात आला आहे. आज दिल्लीत प्रमुख नेत्यांची बैठक पार पडली आणि या बैठकीत यादीबद्दल नाराजी देखील व्यक्त करण्यात आली होती. नंतर सुधारित यादी जाहीर करुन या तीन नेत्यांची नावे प्रथम देण्यात आली आहेत.

### रेल्वेची भाडेवाढ आजपासून लागू

**नवी दिल्ली :** भारतीय रेल्वे एक जुलैपासून देशभरातील लांब पल्ल्याच्या गाड्यांमधील द्वितीय श्रेणीचे भाडे वाढवणार आहे. कमाल भाडे प्रति किलोमीटर २ पैशांनी वाढेल. जनरल नॉन-एसीच्या स्लीपर क्लास आणि फर्स्ट क्लासचे भाडे प्रति किलोमीटर ५० पैशांनी वाढवण्यात आले आहे. तर मेल आणि एक्सप्रेस नॉन-एसी गाड्यांचे भाडे प्रति किलोमीटर १ पैशाने वाढेल. याशिवाय, एसी क्लासमध्ये प्रति किलोमीटर २ पैशांनी वाढ होईल. मासिक हंगामी तिकिटे आणि उपनगरीय (लोकल) गाड्यांच्या भाड्यात कोणताही बदल झालेला नाही.

### ५७ हजार ५०९ कोटींच्या पुरवणी मागण्या सादर

# सरकारचा पायाभूत सुविधांवर विशेष भर

**मुंबई, दि. ३० :** विधिमंडळाच्या आजपासून सुरु झालेल्या पावसाळी अधिवेशनात पहिल्या दिवशी उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी ५७ हजार ५०९ कोटी ७१ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या विधिमंडळात सादर केल्या. हा निधी प्रामुख्याने राज्यात रस्ते, मेट्रो, सिंचन योजनांसारख्या पायाभूत प्रकल्पांसाठी, सिंहस्थ कुंभमेळ्याचे नियोजन व अंमलबजावणी, महात्मा जोतिराव फुले आरोग्य योजना, संजय गांधी निराधार अनुदान योजना, मागास विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती तसेच दुर्बल, वंचित समाजघटकांच्या विकासासाठी उपयोगात आणण्यात येणार आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सादर केलेल्या पुरवणी मागण्यांपैकी १९ हजार १८३ कोटी ८५ लाख रुपये अनिवार्य तर ३४ हजार ६६१ कोटी ३४ लाख रुपये कार्यक्रमांतर्गत आणि ३ हजार ६६४ कोटी ५२ लाख रुपये केंद्र पुरस्कृत कार्यक्रमांतर्गत अर्थसहाय्य उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने पुरवणी मागण्या आहेत. स्थूल पुरवणी मागण्या ५७ हजार ५०९ कोटी ७१ लाख रुपयांच्या असल्या तरी त्याचा प्रत्यक्ष निव्वळ भार हा ४० हजार ६४४ कोटी ६९ लाख रुपयांचा आहे. ५७ हजार ५०९ कोटी ७१ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्यांपैकी सर्वाधिक ११ हजार ४२ कोटी ७६ लाख रुपये हे पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार अनुदानासाठी खर्च होणार आहेत. ३ हजार २२८ कोटी ३८ लाख रुपये हे मेट्रो प्रकल्प, महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा यांच्या *(पान दोनवर)*



**रस्ते, मेट्रो, सिंचन, कुंभमेळा, मागास घटक विकासावर लक्ष**

### ■ मी मराठीने वेधले लक्ष

अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी कामकाज सुरु होण्यापूर्वी हिंदी सक्तीचा जीआर रद्द करण्याच्या निर्णयाचे पडसाद उमटले. सभागृहाचे कामकाज सुरू होण्यापूर्वी विधानभवनाच्या पायऱ्यांवर ठाकरे गटाचे आमदार 'मी मराठी' टोपी घालून दाखल झाले. यावेळी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी महसूल मंत्री *(पान दोनवर)*

### कोणाच्या दबावाखाली न येता निर्णय घेणार : मुख्यमंत्री

## पक्षाचे नाही तर राज्यातील विद्यार्थ्यांचे हित पाहणार

**मुंबई, दि. ३० :** महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे हित पाहून सरकारने निर्णय घेतला आहे. आम्ही निर्णय घेताना कोणत्याही पक्षाचे हित पाहिले नाही. त्यामुळे कोणाच्याही दबावाखाली न येता योग्य तोच निर्णय घेऊ, असे सांगतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोन ठाकरे बंधू एकत्र येऊ नयेत असा काही जीआर आम्ही काढला नाही, त्यांनी एकत्र यावे आणि क्रिकेट खेळावे, जेवण करावे. आम्हाला त्याचा काही फरक पडणार नाही, असा जोरदार टोलाही लगावला.

राज्यातील शाळांमध्ये पहिलीपासून हिंदी भाषेसंबंधी काढण्यात आलेले दोन जीआर राज्य शासनाने रद्द ठरवले. हा मराठी माणसाच्या एकजुटीचा विषय असल्याचे ठाकरे बंधूंनी सांगितले. त्यावर मुख्यमंत्र्यांनी प्रतिक्रिया दिली. मुख्यमंत्री म्हणाले, की उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना त्यांचा उजवा हात समजल्या जाणाऱ्या नेत्याने हिंदी सक्तीची करा अशी शिफारस केली होती. *(पान दोनवर)*

## विजयी मेळाव्याआडून बंधू मिलनाचे प्रयत्न!


**मुंबई, दि. ३० :** पहिलीपासून त्रिभाषा सूत्र लागू करण्याबाबतचे शासन आदेश रविवारी मुख्यमंत्र्यांनी रद्द केले आणि दोन्ही ठाकरेंच्या पक्षांनी जल्लोष केला. या दोन्ही पक्षाकडून आता पाच जुलै रोजी विजयी मेळावा घेण्यात येणार आहे. वरळी डोम येथे हा मेळावा होईल, असे सांगितले जात आहे.

राज्यात पहिलीपासून त्रिभाषा सूत्र लागू करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला होता. सरकारच्या या अप्रत्यक्ष हिंदी सक्ती विरोधात दोन्ही ठाकरे बंधू एकवटले आणि पाच जुलै रोजी मुंबईत मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. राज्य शासनाने हिंदीचा जीआर मागे घेतला. त्यामुळे हा मोर्चा होणार नसल्याचे जाहीर करण्यात आले. आज पत्रकार परिषदेत राज ठाकरे तसेच उद्धव ठाकरे यांनीही हा मराठी माणसाचा विजय असल्याचे सांगून आता विजयी मेळावा घेऊ, असे सकाळी जाहीर केले. त्यानुसार सायंकाळी ठाकरे आणि मनसेची ही युती मोर्चाच्या पलीकडे असावी *(पान दोनवर)*

### वैद्यकीय शिक्षणासाठी कराडमध्ये प्रवेश

## नांदेडच्या योगेश्वरी निटुरेचा कराडमध्ये अपघाती मृत्यू

**नांदेड, दि. ३० :** नांदेड शहरातील प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. नागप्पा निटुरे यांची मुलगी योगेश्वरी निटुरे हिचे रविवारी (दि. २९) सातारा जिल्ह्यातील कराड येथे अपघाती निधन झाले. योगेश्वरीच्या अपघाती मृत्यूची माहिती नांदेडला येताच वैद्यकीय क्षेत्रासह शहरात शोककळा पसरली आहे.



शहरातील प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. नागप्पा निटुरे यांची मुलगी योगेश्वरी निटुरे सातारा जिल्ह्यातील कराड येथे वैद्यकीय शिक्षण घेत होती. रविवारी पायऱ्या उतरत असताना घसरून खाली पडल्याने ती गंभीर जखमी झाली होती. तिला लगेच उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, योगेश्वरीचा तत्पूर्वीच मृत्यू झाला. याची माहिती नांदेडला मिळताच वैद्यकीय क्षेत्रासह शहरात शोककळा पसरली आहे.

### राज ठाकरेंची भूमिका काँग्रेसला अमान्य

## ठाकरे बंधू एकत्र आल्यास मविआचे अस्तित्व संपणार?

**मुंबई, दि. ३० :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे एकत्र येणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. तर दुसरीकडे दोन्ही बंधू एकत्र आले तर आगामी मुंबई महापालिका निवडणुकीत काँग्रेस स्वबळावर निवडणूक लढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अशा स्थितीत महाविकास आघाडीच्या अस्तित्वावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी आज असे संकेत दिले आहेत. त्यामुळे आगामी महापालिका निवडणुकीत महाविकास आघाडीत फूट पडणार की काय? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. विशेष म्हणजे राज ठाकरे यांची उत्तर भारत आणि दक्षिण भारत ही भूमिका मान्य नाही. भारत एक आहे, अशी बोलकी प्रतिक्रिया चेन्नीथला यांनी दिली आहे. त्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत काँग्रेस आणि ज्येष्ठ नेते शरद पवारांच्या *(पान दोनवर)*

### दरात १५ टक्के सवलत : आजपासून योजनेची अंमलबजावणी

# एसटीच्या आगाऊ आरक्षणावर सूट!

**मुंबई, दि. ३० :** एसटीच्या लांब व मध्यम पल्ल्याच्या (१५० किमीपेक्षा जास्त) प्रवासासाठी आगाऊ आरक्षण करणाऱ्या पूर्ण तिकीटधारी (सवलतधारक प्रवासी वगळून) प्रवाशांना तिकीट दरात १५ टक्के सवलत दिली जाणार आहे. ही योजना आज परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी जाहीर केली. एक जुलैपासून ही योजना लागू होणार आहे.

कमी गर्दीच्या हंगामामध्ये लांब पल्ल्याच्या बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना आगाऊ आरक्षण केल्यास त्यांच्या तिकीटामध्ये १५ टक्के सूट देण्यात येईल. या घोषणेनुसार ही योजना सर्व प्रकारच्या बससाठी एक जुलैपासून लागू करण्यात येत आहे. अर्थात, ही योजना पूर्ण तिकीट काढणाऱ्या प्रवाशांसाठीच लागू राहणार आहे. येत्या आषाढी एकादशी, गणेशोत्सवासाठी आगाऊ आरक्षण करणाऱ्या प्रवाशांना या योजनेचा *(पान दोनवर)*



### ■ ई-शिवनेरी प्रवाशांनाही लाभ

मुंबई-पुणे मार्गावर धावणाऱ्या एसटीच्या प्रतिष्ठित ई-शिवनेरी बसमधील प्रवाशांना या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेता येईल. आगाऊ आरक्षण करणाऱ्या प्रवाशांनी प्रत्यक्ष तिकीट खिडकीवर आणि एसटीच्या अधिकृत संकेतस्थळावर अथवा एमएसआरटीसी बस रिझर्व्हेशन या मोबाईल ॲपद्वारे तिकीट आरक्षित केल्यास त्यांना १५ टक्के सवलत प्राप्त करता येऊ शकेल.

# भाजपा प्रदेशाध्यक्षपदासाठी रवींद्र चव्हाण यांचा अर्ज दाखल

**आज होणार अधिकृत घोषणा | भाजपा राज्य परिषदेचे आज अधिवेशन**

**मुंबई, दि. ३० :** भाजपाच्या प्रदेशाध्यक्षपदासाठी विद्यमान कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी आज (दि ३०) उमेदवारी अर्ज दाखल केला. युवा मोर्चाचा सामान्य कार्यकर्ता म्हणून राजकीय प्रवास सुरु केलेल्या रवींद्र चव्हाण यांना संघटनेच्या कामाचा मोठा अनुभव असल्याने ते प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी ताकदीने पार पाडतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. भाजपाच्या राज्य परिषदेचे अधिवेशन मंगळवारी (दि. एक) वरळी येथे होणार असून या अधिवेशनात प्रदेशाध्यक्षपदाच्या नावाची घोषणा होईल.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, ज्येष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार, उच्च व तंत्रशिक्षण *(पान दोनवर)*




## राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी धर्मेंद्र प्रधान यांची चर्चा!

**नवी दिल्ली :** भाजपाच्या नव्या राष्ट्रीय अध्यक्षांची निवड लवकरच होण्याची शक्यता वाढली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पुढील काही आठवड्यांमध्ये नवीन अध्यक्षांची निवड होऊ शकते. संघ परिवारातील विविध घटक आणि संस्था यांच्यामध्ये अध्यक्ष पदाबद्दल एकमत झाले असून अध्यक्ष निवडीची प्रक्रिया लवकरच पूर्ण होईल. त्यासाठीच्या हालचालींना वेग आला आहे. २१ जुलैपासून संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरु होत आहे. त्याआधीच अध्यक्ष निवडीची प्रक्रिया पूर्ण करण्याचा भाजपाचा प्रयत्न आहे. राज्य शाखांच्या मतदानाची प्रक्रिया सध्या सुरु आहे. ती पूर्ण झाल्यावरच भाजपा अध्यक्षांचे नाव जाहीर करण्यात येईल. *(पान दोनवर)*

## मालेगावमध्ये गॅस सिलेंडरचा स्फोट: घरगुती साहित्य खाक


### रोजंदारी महिलेचे मोठे नुकसान; सुदैवाने जीवितहानी टळली

**मालेगाव, दि. ३० :** अर्धापूर तालुक्यातील मालेगाव येथील इंदिरानगर भागात सोमवारी दुपारी घरगुती सिलेंडरचा स्फोट होऊन त्यात घरगुती सामान आणि संसारोपयोगी साहित्य जळून जवळपास दीड लाखांचे नुकसान झाले.

मालेगाव येथील इंदिरानगर भागात कमलाबाई संभाजी वाहुळे यांचे घर असून दुपारी स्वयंपाक करण्याच्या हेतूने सिलेंडर सुरू करत असताना अचानक सिलेंडरचा भडका उडाला. भडका उडतात त्यांचा मुलगा घराबाहेर पळाला. सुदैवाने यात कुठली जीवितहानी झाली नाही. परंतु, घरातील अन्नधान्य व इतर संसारोपयोगी आणि रोख रक्कम या स्फोटात जळून खाक झाली आहे. जवळपास दीड लाख रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती आहे.



घटनास्थळाचा पंचनामा महसूल प्रशासनाच्या वतीने करण्यात आला आहे. कमलबाई वाहुळे ग्रामपंचायतमध्ये रोजंदारीवर सफाई कामगार म्हणून काम करतात. त्यांना तत्काळ आर्थिक मदत करण्याची मागणी माजी सरपंच अनिल इंगोले यांनी केली आहे.



## संक्षिप्त

### विठुरायाची भेट अपूर्ण! दोन वारकऱ्यांचा मृत्यू

**सातारा :** एकीकडे वारकऱ्यांना विठुरायाच्या भेटीची ओढ लागली असतानाच माऊलींच्या पालखी सोहळ्यातील दोन वारकऱ्यांचा विजेच्या धक्क्याने मृत्यू झाला आहे. फलटणमध्ये माऊलींच्या पालखीच्या विसाव्यासाठी टेंट उभारत असताना लोखंडी खांबाला हात लावताच विजेचा धक्का बसल्याने मधुकर शेंडे (वय ५७) आणि तुषार बावनकुळे (वय २५) या दोन वारकऱ्यांचा मृत्यू झाला. प्रथम मधुकर शेंडे यांना विजेचा धक्का बसला यांना वाचवण्यासाठी तुषार बावनकुळे गेले असता दोघांचा दुर्दैवी मृत्यू झाला. हे दोघेही माऊलींच्या रथामागे चालणाऱ्या दिंडी क्रमांक २६ मधील वारकरी होते. ही दिंडी नागपूर जिल्ह्यातील विहार तालुक्याच्या वासुदेव महाराज टापरे (रा.काटोल) यांची आहे.

### तिघांचे नाव साई अन् एकाच वेळी बुडून मृत्यू

**नाशिक :** नाशिकच्या आडगाव परिसरात अमृतधाम परिसरातील एका बांधकाम साइटवरील तळ्यात तीन शाळकरी मित्र पोहण्यासाठी गेले होते. पाऊस सुरू असल्याने तिघांनीही एकत्रितपणे पोहायला जाण्याचा प्लान केला. मात्र, यातच तिघांचा बुडून दुर्दैवी मृत्यू झाला आहे. साई जाधव, साई गरड आणि साई उगले अशी तिघांची नावे आहेत. तिघेही सकाळपासून बाहेर गेली होती, कुटुंबीयांनी त्यांचा अगदी त्र्यंबकेश्वरपर्यंत शोध घेतला असता ते सापडले नाहीत. आज सकाळी घराजवळीलच साइटवर तळ्यात त्यांचे मृतदेह आढळून आले. हे तिघेही जिवलग मित्र होते. तसेच एकाच शाळेत शिकत होते. तिघांची नावे सारखीच असल्याने परिसरात ते प्रसिद्ध होते. त्यांच्या आकस्मिक मृत्यूने हळहळ व्यक्त केली जात आहे.

### भारत-पाक सीमेवर दोन मृतदेह सापडले

**जयपूर :** राजस्थानच्या जैसलमेरमध्ये भारत-पाकिस्तान सीमेवर १५ वर्षीय अल्पवयीन मुलगी आणि एका २० वर्षीय तरुणाचा मृतदेह सापडल्याने खळबळ उडाली आहे. दोन्ही मृतदेह ६ ते ७ दिवसांपूर्वीचे असल्याची माहिती समोर आली आहे. मृतदेहांजवळ पाकिस्तानी सीम आणि ओळखपत्रंदेखील सापडली आहेत. मृत पावलेले मुलगा, मुलगी पाकिस्तानचे असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. दोघांच्या मृत्यूंचे नेमके कारण अद्याप समोर आले नाही. मुलगा, मुलगी भारताचे रहिवासी होते की पाकिस्तानचे याचा तपास केला जात आहे.

### संजय पवारांचा ठाकरेंच्या उपनेतेपदाचा राजीनामा

**कोल्हापूर :** कोल्हापूरमध्ये ठाकरे गटाचा अस्तित्वाचा संघर्ष सुरू असताना पदाधिकाऱ्यांच्या नाराजीनाट्याने टोक गाठले आहे. ठाकरे गटाकडून जिल्हाप्रमुखपदी रविकिरण इंगवले यांची नियुक्ती करण्यात आल्यानंतर हर्षल सूर्वे यांनी शहर समन्वयक पदाचा राजीनामा दिला तर आज शिवसेना उपनेते संजय पवार यांनी सुद्धा आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. विशेष म्हणजे २०२२ मध्ये राज्यसभा निवडणुकीसाठी संजय पवार यांना शिवसेनेकडून उमेदवारी देण्यात आली होती. ही उमेदवारी थेट छत्रपती संभाजी राजे यांच्या विरोधात होती आणि तेव्हाच शिवसेना फुटली होती आणि आता तेच संजय पवार जिल्हाप्रमुख निवडीने नाराज असून त्यांनी उपनेतेपदाचा राजीनामा दिला आहे. पदाचा राजीनामा दिला असला, तरी उद्धव ठाकरेंचा शिवसैनिक म्हणून काम करणार असल्याचे म्हटले आहे.

### घुसखोरी करताना पाकिस्तानी गाईड ताब्यात

**श्रीनगर :** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतरही पाकिस्तानकडून सातत्याने भारतात घुसखोरीचे प्रयत्न केले जात आहेत. प्रत्येकवेळी भारतीय सैन्य हे घुसखोरीचे प्रयत्न हाणून पाडत आहे. दरम्यान, रविवारी राजौरी येथील नियंत्रण रेषेवर (एलओसी) दहशतवाद्यांनी घुसखोरीचा प्रयत्न केला. मात्र, भारतीय सैन्याने हा प्रयत्न उधळून लावला. या दरम्यान एका पाकिस्तानी गाईडला अटक करण्यात आल्याचे लष्कराने सांगितले. घुसखोरीचा प्रयत्न करणाऱ्या ४-५ सशस्त्र दहशतवाद्यांच्या हालचाली सैनिकांनी पाहिल्या. या संयुक्त कारवाईदरम्यान, एका व्यक्तीला अटक करण्यात आली. हा व्यक्ती पाकिस्तानी गाईड असून, तो घुसखोरीला मदत करत होता.

### शेअर बाजार गडगडला! सेन्सेक्स, निफ्टी घसरले

**मुंबई :** भारतीय शेअर बाजारात सुरू असलेल्या तेजीला आज सप्ताहाच्या पहिल्याच दिवशी ब्रेक लागला. जून महिन्याच्या शेवटच्या सत्रात बाजारात मोठी घसरण दिसून आली, ज्यामुळे गुंतवणूकदारांमध्ये थोडी चिंता निर्माण झाली. सेन्सेक्स ४५२.४४ अंकांनी घसरून ८३६०६.४६ वर बंद झाला, तर निफ्टी १२०.७५ अंकांनी घसरून २५,५१७.०५ वर स्थिरावला. दिवसभर निफ्टी २५५०० च्या पातळीचे रक्षण करण्याचा प्रयत्न करत होता.

---

**माजी आमदार कुणाल पाटील आणि अपूर्व हिरेंच्या हातात कमळ : नाशिक, धूळे, परभणीत राजकीय समीकरणे बदलणार**

# उत्तर महाराष्ट्रात काँग्रेसला खिंडार!

## अपूर्व हिरे करणार उद्या मुंबईत भाजपामध्ये प्रवेश

**मुंबई, दि. ३० :** गेल्या काही दिवसांपासून उत्तर महाराष्ट्र आणि नाशिकमधून भाजपामध्ये प्रवेशाचा धडका सुरू झाला आहे. सुधाकर बडगुजर यांच्या पाठोपाठ आता माजी आ. अपूर्व हिरे देखील भाजपामध्ये प्रवेश करणार आहेत. अपूर्व हिरे यांनी स्वतः पत्रकार परिषद घेऊन याबाबत माहिती दिली. त्यांचा भाजपा प्रवेश दोन जुलैला होणार आहे.



अपूर्व हिरे म्हणाले, की नाशिक शहराच्या विकासासाठी काही मुद्दे आहेत, त्यासाठी भाजपामध्ये प्रवेश करत आहे. नाशिकला कुंभमेळा आहे. येथे आयटी पार्क व्हावा, ही आमची भावना आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत सकारात्मक चर्चा झाली म्हणून भाजपामध्ये जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा मी राजीनामा देत आहे. अनेक विकासकामे भाजपा आणि देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून झाली आहेत. त्यामुळे आम्ही भाजपा जात आहोत. तरुणांचा ओढा भाजपाकडे आहे.

दोन जुलै रोजी भाजपामध्ये प्रवेश करणार आहोत, अशी माहिती त्यांनी दिली आहे. आ. सीमा हिरे यांच्या विरोधात मी निवडणूक लढवली होती. पण, आमच्यात दुरावा नव्हता. आता आम्ही सोबत काम करू. माझा भाऊ ठाकरे गटाचे काम करतो. पण, तो मालेगावला काम करतो. मी पदाचे नाही तर शहराच्या विकासाचे प्रश्न घेऊन राजकारण करतो, असेही त्यांनी यावेळी सांगितले. दरम्यान, अपूर्व हिरे हे शिक्षक मतदारसंघाचे आमदार राहिलेले आहेत.

## माजी आ. कुणाल पाटीलही करणार भाजपामध्ये प्रवेश

**मुंबई, दि. ३० :** उत्तर महाराष्ट्रातीलच नव्हे तर प्रदेश काँग्रेसचे महत्वाचे नेते रोहिदास पाटील यांचे चिरंजीव आणि धुळ्याचे माजी आमदार आणि काँग्रेसचे प्रदेश कार्याध्यक्ष कुणाल पाटील हेही आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह मंगळवारी भाजपात प्रवेश करणार आहेत.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत कुणाल पाटील यांचा प्रवेश होणार आहे.

माजी आ. कुणाल पाटलांच्या प्रवेशामुळे काँग्रेसला मोठे खिंडार पडणार आहे. कुणाल पाटील यांच्या भाजपा प्रवेशाच्या पार्श्वभूमीवर धुळे ग्रामीण विधानसभा मतदारसंघातून कार्यकर्ते मुंबईला रवाना झाले आहेत. यामध्ये जिल्हा परिषद आणि पंचायत समितीचे माजी सदस्य, सरपंच, उपसरपंच आणि बाजार समिती सभापती, संचालकांचा समावेश आहे. एवढ्या मोठ्या संख्येने भाजपात प्रवेश होणार असल्याने जिल्ह्यात काँग्रेसला मोठे खिंडार पडले आहे. धुळे जिल्ह्यात कुणाल पाटील यांची मोठी ताकत आहे, यामुळे धुळे जिल्ह्यात भाजपाचे बळ वाढणार आहे. दोनच दिवसांपूर्वी त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांचा मेळावा घेतला होता, याच मेळाव्यात त्यांनी पक्ष सोडण्याचे संकेत दिले होते. कार्यकर्त्यांचा विचार घेऊन आपण निर्णय घेऊ असे त्यांनी म्हटले होते. मंगळवारी दुपारी दोन वाजता मुंबईतील भाजपा प्रदेश कार्यालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ना. चंद्रशेखर बावनकुळे आणि रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत हा प्रवेश होणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

## माजी आ. विजय भांबळे तुतारी सोडून घड्याळ बांधणार

**मुंबई, दि. ३० :** शरद पवारांची साथ सोडून मंगळवारी जिंतूरचे माजी आ. विजय भांबळे उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करणार आहेत, अशा चर्चा जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात सुरु झाल्या आहेत.



विजय भांबळे यांनी भाजपाच्या विद्यमान मंत्री मेघना बोर्डीकर यांच्या विरोधात सेलू-जिंतूर विधानसभा मतदारसंघातून दोनवेळा निवडणूक लढवली होती. दोन्ही वेळा त्यांचा पराभव झाला होता. जिंतूरमध्ये रामप्रसाद बोर्डीकर आणि भांबळे यांचे राजकीय वैर नेहमीच चर्चेत असते. नवाब मलिक यांच्या प्रयत्नातून विजय भांबळे राष्ट्रवादीच्या वाटेवर असल्याचे सांगितले जात आहे. मंगळवारी मुंबईत महिला विकास महामंडळाच्या कार्यालयात पक्षप्रवेशाचे आयोजन करण्यात आले आहे. विजय भांबळे यांच्या पक्षप्रवेशासाठी स्वतः उपमुख्यंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे उपस्थित राहणार आहेत. याबाबत स्वतः भांबळे यांनी मात्र कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही. पक्ष प्रवेश होणार की नाही याला दुजोरा दिला नाही किंवा खंडनही केले नाही. मात्र, भांबळे यांचे समर्थक खासगीत याला दुजोरा देत आहेत. मीडिया रिपोर्ट्नुसार त्यांचा मोबाईल सोमवारी सायंकाळपर्यंत बंद होता. त्यामुळे त्यांची प्रतिक्रिया समजू शकली नाही. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर परभणी जिल्ह्याच्या राजकारणासाठी ही महत्वाची राजकीय घडामोड मानली जात आहे.

---

**राज्यात ३९ मृत्यू; बिहारमध्ये वीज कोसळून पाच ठार**

# हिमाचलमध्ये पावसाचे थैमान

**शिमला/पाटणा, दि. ३० :** हिमाचल प्रदेशात रविवारपासून मुसळधार पाऊस पडत आहे. भूस्खलनामुळे राज्यातील १२९ मार्गांवरील वाहतूक थांबली आहे. पावसाळ्यापासून आतापर्यंत राज्यात ३९ जणांचा मृत्यू झाला आहे. गेल्या २४ तासांत तीन जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. सोमवारी सकाळी हिमाचलच्या मंडी-कुल्लू राष्ट्रीय महामार्गावरील थलौतच्या भुभू जोत बोगद्याजवळ भूस्खलन झाले. यामुळे रस्ते वाहतुकीवर परिणाम झाला आहे. अनेक वाहने बोगद्यात अडकली आहेत. सतर्कतेमुळे आज हिमाचलच्या चार जिल्ह्यांमध्ये शाळा बंद आहेत.



दुसरीकडे, बिहारमधील भोजपूर, बक्सर आणि नालंदा येथे वीज कोसळून पाच जणांचा मृत्यू झाला. त्याच वेळी रविवारी गया येथील इमामगंज येथील लागुरही धबधब्यात अचानक पाणी वाढले. जोरदार प्रवाहात सहा मुली वाहून गेल्या. स्थानिक लोकांनी सर्वांना सुरक्षित बाहेर काढले. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, ३१ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये मान्सून सक्रिय झाला आहे. उत्तराखंड आणि झारखंडमध्ये रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. मध्य प्रदेश-राजस्थानसह १२ राज्यांमध्ये मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट आहे तर १७ राज्यांमध्ये ऑरेंज अलर्ट आहे. दरम्यान, हिमाचल प्रदेशातील शिमला येथे पाच मजली इमारत कोसळली. येथील भट्टाकुफर येथे ही दुर्घटना घडली. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. धोका लक्षात घेता इमारत आधीच रिकामी करण्यात आली होती. शिमलाच्या अनेक भागात भूस्खलन आणि रस्ते बंद झाल्यामुळे सामान्य जनजीवन विस्कळीत झाले. रविवारी रात्री ढगफुटीमुळे ३ कुटुंबांची घरे आणि गायी वाहून गेल्या. मुसळधार पावसामुळे सिरमौर जिल्ह्यातील गिरी-जाटोन धरण आणि मंडी जिल्ह्यातील पांडोह धरणातून पाणी सोडण्यात आले आहे, ज्यामुळे गिरी आणि बियास नद्यांची पाणी पातळी धोक्याच्या पातळीवर पोहोचली आहे.


---

**जगभरातील १०० बौद्ध धर्मगुरु सहभागी होणार : चीन टेन्शनमध्ये**

# दलाई लामांचा उत्तराधिकारी निवडणार

**नवी दिल्ली, दि. ३० :** नव्या दलाई लामांच्या नियुक्तीसाठी हिमाचल प्रदेशच्या धर्मशाळा येथे हालचाली वाढल्या आहेत. १४ वे दलाई लामा तेनजिन ग्यात्सो आपल्या जन्मदिवसाच्या आधी धर्मशाळा येथे तीन दिवसांची बैठक करणार आहेत. या बैठकीत जगभरातील १०० बौद्ध धर्मगुरु सहभागी होणार आहेत. दलाई लामांचा उत्तराधिकारी कोण? याचा निर्णय या बैठकीत होऊ शकतो. दुसरीकडे या निवडीमुळे चीन मात्र प्रचंड तणावात आहे.

येत्या सहा जुलै रोजी तिबेटी धर्मगुरु याची घोषणा करु शकतात. वृत्तसंस्था रॉयटर्सनुसार २०१९ नंतर पहिल्यांदा इतकी मोठी बैठक धर्मशाळा येथे बोलवण्यात आली आहे. या बैठकीबद्दल गोपनीयता बाळगण्यात आली होती. ब्रिटेनिकानुसार बौद्ध धर्म गुरुंना लामा म्हटले जायचे. ११ व्या शतकात दलाई लामा हे पद बनवण्यात



आले. सुरुवातीला दलाई लामा हे फक्त एक धार्मिक आणि श्रद्धेच पद होते. वेळेनुसार या पदाची जबाबदारी बदलत गेली. १३ व्या दलाई लामांनी किंग राजवंश असताना, तिबेटमधून चिनी सैनिकांना पळवून लावले होते.

चिनी सैनिक निघून गेल्यानंतर तिबेटमध्ये त्यांनी शासन केले. १४ वे दलाई लामा आल्यानंतर तिबेटमध्ये चीनने वेगळा मोर्चा उघडला. १९६० मध्ये चीनमध्ये तिबेटी आक्रमण सुरु झाले. त्यानंतर दलाई लामांना तिबेट सोडावे लागले. भारतात धर्मशाळा येथे येऊन दलाई लामांनी निर्वासित सरकारची स्थापना केली. इथूनच ते बौद्ध धर्माचे अनुयायी आणि तिबेटी लोकांशी संवाद साधतात. दलाई लामांच्या नियुक्तीच जे नियम आहेत, त्यानुसार तिबेटमध्ये जन्मलेल्या त्या मुलाचा शोध घेतला जातो, ज्याचा आत्मा वर्तमान दलाई लामांशी मिळतो.

अध्यात्मिक दृष्टीने होणारा हा शोध बरीच वर्षे सुरु असतो. यावेळी तिबेट शिवाय भारताच्या अन्य भागातून मुलांचा शोध घेतला जाऊ शकतो. असे झाल्यास ३८५ वर्षांपासून सुरु असलेली परंपरा तुटू शकते. दलाई लामाची नियुक्ती योग्य नाही, असे चीनच म्हणणे आहे. चीनला आपल्या पद्धतीने नव्या दलाई लामांची नियुक्ती करायची आहे. आपण चीनचा भाग आहोत, हे तिबेटने जर स्वीकारले, तर त्यांच्याशी या विषयावर बोलणे होऊ शकते असं दलाई लामांच्या निवडीसंदर्भात चीनने म्हटले होते.

---

## पान एकवरून

**सरकारचा पायाभूत...**

मुद्रांक शुल्क अधिभार परताव्यापोटीचे आहेत. राष्ट्रीय सहकार विकास निगम (एनसीडीसी) यांच्याकडून महाराष्ट्र शासनामार्फत सहकारी सहकारी साखर कारखान्यांना खेळत्या भागभांडवलासाठी मार्जिन मनी लोनसाठी २ हजार १८२ कोटी ६९ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. दरम्यान, विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या कामकाजास विधानपरिषदेत 'वंदे मातरम्' आणि राज्यगीताने सुरुवात झाली. विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यासह मंत्री आणि विधानपरिषदेचे सदस्य यावेळी उपस्थित होते. यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवीन मंत्री छगन भुजबळ यांचा सभागृहाला परिचय करून दिला. तर दोन्ही सभागृहात ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ जयंत नारळीकर यांच्यासह दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

**मी मराठीने वेधले...**

चंद्रशेखर बावनकुळे यांना मी मराठी असे लिहिलेली टोपी घालून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. यानंतर आदित्य ठाकरे आणि चंद्रशेखर बावनकुळे यांच्यात हस्तांदोलनही झाले. तसेच भास्कर जाधव आणि अजय चौधरी हे देखील मी मराठी असे लिहिलेली टोपी घालून उपस्थित होते. उद्धव ठाकरे देखील विधानभवनात पोहोचले होते.

**भाजपा प्रदेशाध्यक्षपदासाठी...**

मंत्री चंद्रकांत पाटील, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, मुंबई भाजपा अध्यक्ष तथा सांस्कृतिक कार्यमंत्री आशीष शेलार, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, ज्येष्ठ नेते भाई गिरकर, आ. सुनील कांबळे, आ. उमा खापरे, महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष आ. चित्रा वाघ आदींनी रवींद्र चव्हाण यांच्या वतीने उमेदवारी अर्ज दाखल केले. अर्ज दाखल करताना माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, खा. डॉ. भागवत कराड, खा. डॉ. अजित गोपछडे उपस्थित होते. केंद्रीय अल्पसंख्याक विकास मंत्री व या निवडणुकीसाठीचे निरीक्षक किरेन रिजिजू, राष्ट्रीय सरचिटणीस व प्रदेश प्रभारी खा. अरुण सिंह यांच्याकडे रवींद्र चव्हाण यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. निवडणूक अधिकारी आ. चैनसुख संचेती हेही यावेळी उपस्थित होते. संघटन पर्व अंतर्गत भाजपाच्या सदस्य नोंदणीची प्रक्रिया पार पडल्यानंतर पक्षाच्या ८० संघटनात्मक जिल्हाध्यक्षांची निवडणूक प्रक्रिया पार पडली. त्यापाठोपाठ मंडल अध्यक्षांच्या निवडी झाल्या. प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रीय परिषद व राज्य परिषद सदस्य निवडणुकीचा कार्यक्रम २८ जून रोजी घोषित करण्यात आला. त्यानुसार ३० जुलै रोजी प्रदेशाध्यक्षपदासाठी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली.

**राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी...**

किमान अर्ध्या राज्यांमध्ये अध्यक्षांची निवड झाल्यानंतरच राष्ट्रीय अध्यक्ष निवडले जाऊ शकतात, असे भाजपाची घटना सांगते. १४ राज्यांमध्ये निवडणुका पूर्ण झाल्या आहेत. आणखी ७ ते ९ राज्यांमध्ये येत्या १५ दिवसांत निवडणुका पूर्ण होतील. नव्या अध्यक्षांची निवड झाल्यावर त्यांची कारकीर्द २०२९ च्या लोकसभा निवडणुकीपर्यंत असू शकेल. अध्यक्षपदासाठी तीन नावे शर्यतीत आहेत. यात केंद्रीय ऊर्जा आणि नगरविकासमंत्री मनोहरलाल खट्टर, कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्यासह शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा समावेश आहे. या तिघांपैकी चौहान सर्वात ज्येष्ठ आहेत. त्यांनी अनेक वर्षे मध्य प्रदेशचे मुख्यमंत्रीपद भूषविले आहे. भाजपा नेतृत्त्वाने खट्टर यांच्या नावाचा विचार केला. पण, सखोल चर्चा आणि विचारविनिमय केल्यानंतर तुलनेने तरुण असलेले धर्मेंद्र प्रधान संघटनेतील उद्दिष्ट साध्य करण्यास जास्त योग्य ठरतील, असे नेतृत्त्वाला वाटते. धर्मेंद्र प्रधान अध्यक्ष झाल्यास इतिहास घडेल. कारण याआधी पूर्व भारतातील नेत्याकडे भाजपाने अध्यक्षपद दिलेले नाही. प्रधान यांचे वडील जनसंघाच्या संस्थापकांपैकी एक होते. त्यांनी ओडिशा शाखेची स्थापना केलेली होती. धर्मेंद्र प्रधान यांच्या नावाला संघाने ग्रीन सिग्नल दिल्याचे सूत्रांच्या अहवालने वृत्त एका वर्तमानपत्राने दिले आहे. मूळचे ओडिसातील असलेले प्रधान अध्यक्ष झाले तर पूर्वेकडील राज्याला अध्यक्षपद देण्याची भाजपामध्ये पहिलीच वेळ असेल.

**पक्षाचे नाही तर विद्यार्थ्यांचे...**

तो अहवाल उद्धव ठाकरेंनी स्वीकारला. त्यामुळे हिंदीचा निर्णय त्यांच्या कार्यकाळातच झाला होता. हे दुटप्पी लोक आहेत. याचे सत्तेतले रुप वेगळे आणि विरोधातले रुप वेगळे आहे. ठाकरे बंधू एकत्र न येण्यासाठी भाजपा प्रयत्न करतंय का असा प्रश्न विचारला असता देवेंद्र फडणवीस म्हणाले, की ठाकरे बंधूंनी एकत्र येऊ नये म्हणून मी जीआर काढला नाही. दोन भावांना एकत्र येण्यासाठी मी रोखलंय का? त्यांनी एकत्र यावे, क्रिकेट खेळावं, टेनिस खेळावं, जेवण करावं, काहीही करावं आम्हाला काहीही फरक पडत नाही. राज्यात त्रिभाषा सूत्र स्वीकारायचे की नाही यावर आम्ही एक समिती नेमली आहे. ती समिती आता ठरवेल. आम्ही कुठल्याही पक्षाचे हित पाहणार नाही. आम्ही महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे हित पाहणार. कोणाच्याही दबावाखाली झुकणार नाही, असेही त्यांनी स्पष्टपणे बजावले.

**विजयी मेळाव्याआडून...**

असा सूर दोन्ही पक्षांकडून व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळेच या विजयी मोर्चाच्या निमित्ताने दोन्ही ठाकरेंचे नेते एकमेकांच्या संपर्कात आहेत. ठाकरे आणि मनसेच्या नेत्यांच्या या अनुषंगाने बैठका सुरू आहेत. ठाकरे गटाकडून संजय राऊत आणि अनिल परब तर मनसेचे बाळा नांदगावकर आणि अभिजीत पानसे यांच्यामध्ये एक बैठक पार पडल्याची माहिती समोर आली. या नेत्यांमध्ये जवळपास ४० मिनिटे चर्चा झाल्याची माहिती आहे. पाच जुलैच्या मेळाव्याचे नियोजन कसे करावे याची चर्चा झाल्याची माहिती आहे. हा मेळावा वरळी डोम येथे घेण्यावर दोन्ही पक्षांची सहमती झाल्याचे वृत्त एबीपी माझाने दिले आहे. कोणताही राजकीय अजेंडा नाही, कोणताही राजकीय झेंडा नाही. केवळ मराठीचा मुद्द्यावर जीआर रद्द झाल्याबाबत विजय मेळावा साजरा करण्यावर चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे.

**ठाकरे बंधू एकत्र आल्यास...**

नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्वबळाची भूमिका घेणार का? याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. राज ठाकरे यांची भूमिका आम्हाला अजिबात मान्य नाही. आम्ही त्यांच्या भूमिकेशी सहमत नाही. उत्तर भारत आणि दक्षिण भारत असे काही नाही. भारत एक आहे. उत्तर भारतीयांना काँग्रेस पक्षाने खूप मजबूत केले आहे. खूप संधी देखील दिल्या आहेत. काँग्रेस आपल्या विचारधारांना घेऊन चालणार पक्ष आहे, अशी भूमिका रमेश चेन्नीथला यांनी मांडली आहे. राज ठाकरे जर उद्धव ठाकरेंसोबत आले तर? असा प्रश्न पत्रकारांनी रमेश चेन्नीथला यांना विचारला. त्यावर त्यांनी तेव्हाचे तेव्हा पाहू. अजून काही निश्चित नाही की ते दोन्ही एकत्र येतील, अशी प्रतिक्रिया रमेश चेन्नीथला यांनी दिली. मुंबई महापालिकेची निवडणूक स्वबळावर लढायचे की एकत्र लढायचे याबाबत सात जुलैला मुंबईत पक्षाची बैठक बोलावण्यात आली आहे. या बैठकीत निर्णय घेण्यात येईल, अशी प्रतिक्रिया रमेश चेन्नीथला यांनी दिली.

**एसटीच्या आगाऊ...**

लाभ घेता येऊ शकेल. राज्यभरातून पंढरपूर येथे जाणाऱ्या नियमित बससेवेचे आरक्षण प्रवाशांना त्यांच्या तिकीट दरात १५ टक्के सवलत एक जुलैपासून लागू होत आहे. तथापि जादा बससाठी ही सवलत लागू होणार नाही. तसेच गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्या प्रवाशांना देखील आगाऊ आरक्षण केल्यानंतर या सवलतीचा लाभ घेता येऊ शकतो. एक जूनला एसटीच्या ७७ व्या वर्धापन दिनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी कमी गर्दीच्या हंगामामध्ये लांब पल्ल्याच्या बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी आगाऊ आरक्षण केल्यास त्यांच्या तिकीटामध्ये १५ टक्के सूट देण्यात येईल, अशी घोषणा केली होती. त्यानुसार ही योजना सर्व प्रकारच्या बससाठी लागू करण्यात येत आहे.

---

## रासायनिक कारखान्यात स्फोटात १२ जणांचा मृत्यू


**हैदराबाद, दि. ३० :** तेलंगणातील संगारेड्डी जिल्ह्यातील एका रासायनिक कारखान्यात आज झालेल्या रिॲक्टर स्फोटात किमान १२ जणांचा मृत्यू झाला असून, ३४ जण जखमी झाले आहेत. स्फोटावेळी कारखाना इमारतीत ५० हून अधिक लोक होते आणि अनेक जण अजूनही आत अडकले आहेत. सुटका करण्यात आलेल्यांपैकी काही जण गंभीर जखमी आहेत. आत किती लोक अडकले आहेत हे आम्हाला अद्याप कळलेले नाही, असे पोलीस सूत्रांनी द इंडियन एक्सप्रेसला सांगितले.

लंगणामधील घटनेवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दुःख व्यक्त केले आहे. पीएमओने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स वर पोस्ट करत लिहिले आहे, की तेलंगणातील संगारेड्डी येथील कारखान्यातील आगीच्या घटनेत झालेल्या मृत्यूंमुळे मला दुःख झाले आहे. ज्यांनी आपले प्रियजन गमावले आहेत त्यांच्याबद्दल मी शोक व्यक्त करतो. जखमी लवकर बरे व्हावेत अशी मी प्रार्थना करतो. पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून प्रत्येक मृतांच्या कुटुंबियांना दोन लाख रुपये मदत दिली जाईल. तर जखमींना ५० हजार रुपये दिले जातील. तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केले आहे. त्यांनी घटनास्थळी अडकलेल्या कामगारांना वाचवण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याचे आणि जखमींना त्वरित आणि पुरेशी वैद्यकीय सेवा देण्याचे अधिकाऱ्यांना निर्देश दिले आहेत. तेलंगणाचे माजी मंत्री आणि बीआरएस नेते टी हरीश राव म्हणाले, की आतापर्यंत आठ जणांचा मृत्यू झाला आहे आणि २६ जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

---

## मुख्य सचिव राजेश कुमार यांनी पदभार स्वीकारला

**मुंबई, दि. ३० :** शासनाने राज्याच्या मुख्य सचिवपदी महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजेश कुमार यांची नियुक्ती केली आहे. मंत्रालयातील मुख्य सचिवांच्या दालनात मावळत्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्याकडून त्यांनी ४९ वे मुख्य सचिव म्हणून पदभार स्वीकारला. राज्य शासनाच्या सर्व विभागांच्या योजनांना अधिक गती देऊन सर्वसामान्यांना आपल्या कामांसाठी मंत्रालयापर्यंत येण्याची आवश्यकता भासू नये यासाठी काम करणार असल्याचे मुख्य सचिव राजेश कुमार यांनी यावेळी सांगितले.



राजेश कुमार १९८८ च्या बॅचचे अधिकारी असून त्यांचा जन्म ३ ऑगस्ट १९६५ रोजी झाला. २५ ऑगस्ट १९८८ रोजी ते भारतीय प्रशासकीय सेवेत रुजू झाले. मूळचे राजस्थानमधील सवाई माधोपूर येथील असलेल्या राजेश कुमार यांनी इतिहास विषयात पदव्युत्तर पदवी मिळविलेली आहे. सोलापूर येथे अधिसंख्य सहायक जिल्हाधिकारी पदापासून २४ जुलै १९८९ रोजी आपल्या कारकीर्दीस त्यांनी सुरूवात केली. त्यानंत विविध जिल्ह्यात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हाधिकारी तसेच मंत्रालयात विविध खात्यांचे अतिरिक्त सचिव म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे.

---

## शिवसेना बैठकीत अनेक ठराव संमत

**मुंबई, दि. ३० :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीमध्ये आज शिवसेना कार्यकारिणीची बैठक पार पडली. खा. श्रीकांत शिंदे यांचे अभिनंदन, जातीय जनगणना निर्णयाचे स्वागत, मराठी अस्मिता, भारताची बाजू विदेशात भक्कम मांडणे, पक्षांतर्गत निवडणुका, पक्षाच्या पदाचे पदनाम बदलणे आदी ठराव मांडण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मार्गदर्शन केले. मला कोणते पद द्यायचे यात पदाधिकाऱ्यांचे एकमत नाही. त्यामुळे आधी पदाधिकाऱ्यांनी एकमत करावे, तोपर्यंत माझे मुख्य नेता हेच पद कायम राहील.पक्षप्रमुख या पदासाठी बहुसंख्य पदाधिकाऱ्यांचा आग्रह आहे तर राष्ट्रीयप्रमुख असे नाव द्यावे अशीही काही जणांची इच्छा असल्याचे यावेळी एकनाथ शिंदे यांनी सांगितले.


**CHANGE IN NAME**

My Old Name Is **DHAWALE SAHEBRAO** Which now I am. Changing as New Name **SAHEBRAO PURBHAJI DHAWALE** Hence, forth my all correspondence. Will be vonsider, the same.

**Address**

**SAHEBRAO PURBHAJI DHAWALE**

Vijaynagar, Near Pawadewadi Naka, Nanded. **M. 9420417391**

## सुविचार

निंदा आणि टीका वाट्याला यायला हवी,
फक्त स्तुतीच ऐकू आली तर प्रगतीचे मार्ग बंद होत जातात.

## संपादकीय

# नवयुगाची सुरुवात!

**काही वर्षांपूर्वी देशात कोणतीही सार्वत्रिक निवडणूक म्हटली, की प्रचाराचा धुरळा उडत असे. अलीकडे तीन दशकांत हा प्रकार कमी झाला. आता तर आधुनिक तंत्रज्ञानाचा अगदी मोबाईलचाही वापर मतदान प्रक्रिया आणि निवडणुकीच्या काळात वाढला आहे. निवडणुकीदरम्यान होणारी लाचखोरी, मोफत भेटवस्तू, दारू वाटप, लाऊडस्पीकर वाजवणे यासारख्या आचारसंहिता उल्लंघनाची तक्रार करण्यासाठी अलीकडे तयार केलेल्या सी-व्हिजिल यंत्रणेने नागरिकांना सक्षम करण्यात मोलाची भूमिका बजावली आहे. एका साध्या मोबाइल ॲपचा वापर करून, नागरिक थेट फोटो किंवा व्हिडिओ कॅप्चर करुन त्याची तक्रार थेट निवडणूक आयोगाकडे सुद्धा करु शकतात. निवडणूक यंत्रणा सुद्धा त्याचा तातडीने पाठपुरावा करुन उल्लंघनाचा पुरावा मिळताच लगेचच कारवाई करते. प्रत्येक सी-व्हिजिल प्रकरणावर कारवाई केली जाते आणि १०० मिनिटांच्या वेळेत केलेल्या कारवाईसह उत्तर दिले जाते. ऑक्टोबर-डिसेंबर २०१८ मध्ये पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांमध्ये पहिल्यांदा हा प्रयोग झाला आणि त्याच्या यशस्वीतेनंतर आता त्याचा वापर सर्वच निवडणुकीसाठी सुरु झाला आहे. आता यापुढे जाऊन थेट मोबाईलद्वारे मतदानाची प्रक्रिया अगदी घरी किंवा तुम्ही तुमच्या कार्यालयात, दुकानात, आस्थापनात बसून पूर्ण करु शकता. मतदान प्रक्रियेत झालेला हा बदल ऐतिहासिक म्हटला पाहिजे. त्यामुळे मतदारांना मतदानासाठी मतदान केंद्रावर जाण्याची गरज राहणार नाही. बिहारमध्ये गेल्या आठवड्यात झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत प्रायोगिक तत्त्वावर म्हणून प्रथमच मोबाईल ॲपद्वारे मतदान सुरू करण्यात आले. आणि हा प्रयोग यशस्वी झाला तर आगामी काळात याचा वापर सर्वत्र केला जाईल, असे निवडणूक आयोगाचे म्हणणे आहे. यामुळे विशेषतः ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, गर्भवती महिला, स्थलांतरित मतदार, आजारी किंवा रुग्णालयात दाखल मतदार यांच्यासाठी ही सुविधा मोठा दिलासा ठरणार आहे. शिवाय मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी हा प्रयोग मोठा हातभार लावणार आहे. अनेकवेळा मतदान करण्याची इच्छा असते. मात्र, आजारपण, रुग्णालयात दाखल किंवा अन्य काही कारणांमुळे मतदारांना प्रत्यक्ष केंद्रावर जाऊन मतदान करता येत नाही. आणि त्याचा नाईलाज होतो. आपल्याकडे मतदानाची आकडेवारी नेहमीच कमी होत असल्याची चर्चा होते आणि चिंताही व्यक्त केली जाते. लोकशाहीत प्रत्येक मताला महत्व असते. आणि अपवाद वगळता जवळपास सर्वच निवडणुकीत ३० ते ४० टक्के मतदार मतदानापासून काही ना काही कारणांमुळे वंचित राहतात. त्यामुळे मोबाईल-ॲपवर मतदानाची सुरुवात ही लोकशाहीच्या सुदृढतेसाठी टाकलेले एक महत्वाचे आणि क्रांतीकारी पाऊल ठरणार आहे. भविष्यात मतदानाचा टक्का अगदी शंभर टक्के करण्यासाठी ही प्रक्रिया महत्वाची ठरु शकते. या पार्श्वभूमीवर बिहार राज्य निवडणूक आयोगाने विकसित केलेल्या या मोबाईल ॲपच्या माध्यमातून प्रायोगिक पाटणा, रोहतास आणि पूर्व चंपारण या जिल्ह्यांतील सहा नगरपालिकांच्या मतदानासाठी करण्यात आला. हे ॲप फक्त अँड्रॉइड युजर्ससाठी उपलब्ध असून, ते केवळ पात्र व नोंदणीकृत मतदारांद्वारे वापरण्याची परवानगी आहे. आता प्रश्न असाही उपस्थित होत आहे, की या मतदान ॲपमध्ये छेडछाड करणे शक्य आहे का?, या मतदान ॲपचा गैरवापर होऊ शकतो का? तर निवडणूक आयोगाने याची शक्यता फेटाळून लावली आहे. मतदान प्रक्रिया निष्पक्ष आणि पारदर्शक ठेवण्यासाठी, एका मोबाईल नंबरचा वापर करून फक्त दोन नोंदणीकृत मतदारांना लॉग-ईन करण्याची परवानगी आहे. प्रत्येक मताची पडताळणी मतदार ओळखपत्र वापरून केली जाईल. ही सुविधा अशा लोकांसाठी उपलब्ध असेल जे मतदान केंद्रावर जाऊन मतदान करू शकत नाहीत. ऑनलाईन मतदान करण्यासाठी मतदारांच्या फोनवर एक ॲप इन्स्टॉल केलेले असणे आवश्यक आहे. ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, गर्भवती महिला आणि इतर राज्यात राहणारे मतदार या सुविधेचा लाभ घेऊ शकतात. ही सुविधा मिळविण्यासाठी मतदाराला त्याच्या मोबाईलवर हे ॲप इन्स्टॉल करावे लागेल. त्यानंतर त्याला मतदार यादीत जोडलेला आपला नंबर त्याच्याशी लिंक करावा लागेल. यानंतर नाव, मतदान ओळखपत्र क्रमांक, वय, पत्ता, यासारखी मुलभूत माहिती भरावी लागते. यानंतर मोबाईलवर ओटीपी पाठवून त्याची खात्री केली जाते. मग मतदारांनी ॲपमध्ये सेल्फी घेतली आणि ती लाईव्हनेस डिटेक्शनद्वारे तपासली जाते. हा फोटो मतदारयादीतील फोटोसोबत जुळवला जातो. मतदार आयडी कार्ड स्कॅन करुन माहितीची खात्री केली जाते. त्यानंतर मतदाराने नियोजित वेळेत ॲपवर लॉग ईन करुन नोट नाऊ बटण क्लिक केले की, मग ज्या उमेदवाराला मत दिले आहे त्याची खात्री करण्यासाठी कन्फर्म वोट यावर क्लिक केले जाते. अंतिम खात्री झाल्यावर सबमिट केले की मत नोंदवले जाते. निवडणूक आयोगाच्या मते, हे मतदान पूर्णपणे गुप्त राहते. मतदान पूर्णपणे एन्ड टू एन्ड एन्क्रिप्टेड आणि ब्लॉकनेचवर नोंदवले जाते. ही संपूर्ण प्रक्रिया काही मिनिटांत पूर्ण होते आणि ती एन्ड टू एन्ड एन्क्रिप्टेड व ब्लॉकचेनवर आधारित असल्यामुळे अतिशय सुरक्षित मानली जाते. महत्वाचे म्हणजे ई-मतदान प्रक्रिया पूर्णपणे गुप्त व सुरक्षित आहे. एका मोबाईल नंबरवर फक्त दोन मतदार नोंदणी करू शकतात. प्रत्येक मतदाराची ओळख पडताळणी मतदार ओळखपत्र, ओटीपी आणि लाईव्ह फोटो मॅचिंगद्वारे केली जाते. बिहारमधील प्रायोगिक तत्वावर केलेल्या या प्रयोगाची यशस्वीता तपासून मग येत्या निवडणुकीत ऑनलाईन पद्धतीने मतदानाची व्याप्ती वाढवण्याचा निवडणूक आयोगाचा मानस आहे. यामुळे भविष्यात देशभरात ई-मतदानाची प्रणाली आणखी विस्तारली जाण्याची शक्यता आहे. आणि त्यामुळे देशाच्या लोकशाही प्रक्रियेत एक नवे युग सुरू होईल. भारतासारख्या लोकशाही देशात आपल्या देशासाठी मतदान करण्याचा अधिकार हा एक महत्त्वाचा भाग आहे. आपल्या देशात अनेक लोक मतदान करण्यास पात्र असले तरी, त्याबद्दल फार कमी लोक उत्साही असतात. प्रत्येक निवडणुकीसह, मतदानाच्या टक्केवारीत सकारात्मक वाढ होणे आवश्यक आहे. आणि मोबाईल-ॲपच्या माध्यमातून मतदानात अशी वाढ झाली तर ती नेहमीच स्वागतार्ह आहे. कारण प्रत्येक मत आपल्या देशाच्या चांगल्या भविष्यासाठी महत्त्वाचे आहे.**

हे पत्र मे न्यूजवॉच इंडिया प्रा. लि. करिता प्रकाशक शिवानंद दिंगबरराव महाजन द्वारा प्रकाशित आणि मुद्रक संदीप विलासराव पाटील, सुजया पब्लिकेशन्स प्रा. लि. द्वारा मुद्रीत केले आहे. मुद्रण व प्रकाशन स्थळ : १२१/१२२ सी, नांदेड को. ऑप. इंडस्ट्रीयल इस्टेट. लि., शिवाजीनगर नांदेड-२
**संपादक : शिवानंद दिगंबरराव महाजन**
**कार्यकारी संपादक : संतोष रामराव पांडागळे**
या अंकातील लेखांमधील लेखकांची मते त्यांची वैयक्तिक आहेत. संपादकीय मंडळ त्यांच्या मताशी सहमत असेलच असे नाही.
https://epaper.esatyaprabha.com
र.क्रं.२७९०९/७५.PR.No.-G2/RNP/NND-२५१/२०१८-२०२०
e_mail:dainiksatyaprabha2015@gmail.com

# शिक्षण सारथी: डी.पी. सावंत



**प्रा.संतोष देवराये**
**मो.९८६०८२०६५७**

**नको धर्मकृत्य पैसा खर्चूनिया, घेण्यासाठी विद्या तोच खर्चा!**

थोर समाजसुधारक, कर्मयोगी गाडगे महाराज यांनी वरील वचनातून विद्येचे महत्त्व अधोरेखित केले आहे. विद्या ही सर्वदूर पोहोचावी यासाठी फुले दांपत्यासह महाराष्ट्रातील अनेक शिक्षण महर्षी व समाजसुधारकांनी आपलं आयुष्य वेचले. उपेक्षितांच्या झोपडीतील अंधार दूर करण्यासाठी ज्ञानरूपी दिवा खूप महत्त्वाचा आहे. हा विचार केंद्रस्थानी ठेवून मराठवाड्यातील ऐतिहासिक अशा नांदेड नगरीत श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचे बिजारोपण झाले. मराठवाड्याचे भाग्यविधाते, देशाचे माजी गृहमंत्री श्रद्धेय डॉ. शंकरराव चव्हाण यांनी तत्कालीन आपल्या जाणत्या सहकाऱ्यांना सोबत घेऊन श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचा विस्तार घडवून आणला.

आज महाराष्ट्राचे लोकनेते, राज्याचे माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण यांच्या उत्तुंग नेतृत्वाने ही संस्था भरभराटीला आली आहे. संस्थेच्या उपाध्यक्षा, माजी आमदार सौ.अमिताभाभी चव्हाण यांचे संस्थेच्या उन्नतीकडे विशेष असे लक्ष असते. बदलत्या काळाप्रमाणे आवश्यक तो सकारात्मक बदल घडवून, संस्थेला अद्ययावत ठेवण्यासाठी अपार कष्ट घेणारे संस्थेचे कार्यकुशल सचिव, माजी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री डी. पी. सावंत हे शिक्षणाप्रती समर्पित भाव ठेवून सदैव काम करत असतात.

''दुरितांचे तीमिर जावो'' या ब्रिदाने सुरू झालेल्या श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीला अधिक उंचीवर नेण्यासाठी डी.पी. सावंत हे सातत्याने प्रयत्नरत असतात.शाळा महाविद्यालयातील अध्ययन-अध्यापन प्रक्रिया अधिक गतिमान व विद्यार्थी केंद्रित व्हावी यासाठी अध्यापक वर्ग हा बुद्धिमान, आपल्या कार्याप्रती अपार निष्ठा ठेवून प्रामाणिक काम करणारा असला पाहिजे, यावर डी.पी. सावंत यांचा नेहमीच कटाक्ष राहिला आहे.

जात, धर्म, पंथ, पक्ष याही पलीकडे जाऊन केवळ गुणवत्ता या एकाच निकषावर श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीमध्ये सेवेची संधी मिळते. गुणवत्तेच्या पातळीवरच शिक्षक, प्राध्यापकांची भरती होत असल्याने संस्थेमध्ये प्रज्ञा-प्रतिभावंतांची मोठी रेलचेल पहावयास मिळते. अध्यापकांनी अध्ययन- अध्यापनाबरोबर संशोधन करावे यासाठी संस्थेचे सचिव या नात्याने डी. पी. सावंत हे नेहमीच प्रोत्साहन देत असतात. समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन काम करण्याची त्यांची भूमिका निश्चितच अभिनंदनीय आहे.

गोदाकाठी वसलेले ऐतिहासिक नांदेड शहर आज एज्युकेशन हब झाले आहे. महाराष्ट्रासह देशातील अनेक ठिकाणाहून विद्यार्थी शिक्षणासाठी नांदेड शहरात येत आहेत. हजारो विद्यार्थ्यांच्या आगमनाने नांदेड शहराची अर्थव्यवस्था गतिमान झाली आहे. यातून अनेकांना रोजगार मिळतो आहे. नांदेड शहराला एज्युकेशन हब बनविण्यासाठी श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीने अतिशय महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

एक काळ असा होता, की नांदेड शहर व जिल्ह्यातील विध्यार्थी दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर पुढील शिक्षणासाठी लातूर किंवा अहमदपूरला जात होते. ''गुणवंत मुले ही नांदेडची निकाल मात्र लातूर जिल्ह्याचा'' असे चित्र अनेक वर्ष दिसले. महाराष्ट्रातील नामांकित म्हणून गणल्या जाणाऱ्या यशवंत महाविद्यालयात २००३ ला जिनियस बॅचची निर्मिती झाली आणि लातूरला जाणारा विद्यार्थ्यांचा लोंढा थांबला. उत्तम व दर्जेदार शिक्षण नांदेडमध्ये मिळेल हा विश्वास त्यावेळी पालकांच्या मनात निर्माण करणे, हे एक आव्हानात्मक काम होते. हे आव्हान यशवंत महाविद्यालयाच्या जिनियस बॅचने लिलया पेलले.

ही जिनियस बॅच निर्माण करण्यासाठी त्यावेळी मराठवाड्याचे भाग्यविधाते, श्रद्धेय डॉ.शंकरराव चव्हाण यांचे आशीर्वाद व मार्गदर्शन लाभले. महाराष्ट्राचे लोकनेते, खासदार अशोकराव चव्हाण , माजी आमदार सौ.अमिताताई चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचे सचिव म्हणून डी.पी. सावंत यांनी या जिनियस बॅचच्या निर्मितीसाठी प्रचंड मेहनत घेतली. त्यांच्या सातत्यपूर्ण मेहनत, उत्तम नियोजनातून आणि प्राध्यापकांच्या उत्कृष्ट अध्यापनातून जिनियस बॅचने अप्रतिम निकाल दिला. या जिनियस बॅचमधून हजारो यशवंत घडू लागले. महाराष्ट्रासह देशभरातील नामांकित वैद्यकीय व आभियांत्रिकी महाविद्यालयात यशवंत महाविद्यालयाचे असंख्य विद्यार्थी शिक्षण घेऊ लागले.

आज देशासह जगातील अनेक विकसित राष्ट्रात यशवंत कॉलेजमधील जिनियस बॅचचे विद्यार्थी डॉक्टर, इंजिनियर, संशोधक यासह विविध पदावर काम करताना पाहवयाला मिळतात. या अतुलनीय यशाच्या पाठीमागे शिक्षणतज्ञ डी.पी. सावंत यांचे सूक्ष्म नियोजन व अपार मेहनत आहे,

समाजकारण, राजकारण, शिक्षण, कला, क्रीडा, संगीत, उद्योग या क्षेत्रात स्वतःच्या कार्याचा अमूल्य ठसा उमटवणारे डी.पी. सावंत हे राजकारणातील अनोखं व्यक्तिमत्व आहे. सामाजिक बांधिलकीची भावना ठेवून अगदी नि:स्वार्थ भावनेने काम करणारे डी.पी. सावंत हे कायमच लोकांच्या आदरस्थानी आहेत.

सेवा, समर्पण, निष्ठा, त्याग व प्रामाणिकपणा यांचा समुच्चय म्हणजे डी. पी. सावंत दोन टर्म नांदेड उत्तर विधानसभेचे आमदार म्हणून त्यांनी केलेली जनसेवा मतदारसंघातील लोकांच्या कायम लक्षात राहण्या सारखी आहे. नांदेड शहराला पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू नये,यासाठी त्यांनी मोठ्या प्रयत्नातून आसना नदीवर पर्यायी पाणी पुरवठा योजना उभी केली.मतदार संघातील वाडी बुद्रुक येथे पहिली निमशहरी पाणीपुरवठा योजना कार्यान्वित केली.

१७ करोड रुपयाची ही पाणीपुरवठा योजना मराठवाड्यातील एका ग्रामपंचायतीला मिळण्याचे,हे पहिलेच उदाहरण होते.त्यासाठी डी. पी. सावंत यांनी प्रचंड मेहनत घेतली.ज्यामुळे आज वाडीसह ३० नगराच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमचा मिटला.मतदारसंघात रस्त्याचे जाळे उभे केले.

शेतकऱ्यांना सिंचनाचा योग्य लाभ झाला पाहिजे, यासाठी कॅनॉलची दुरुस्ती करून घेतली. जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून त्यांनी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी घेतलेली तळमळ साऱ्या जिल्ह्याने पाहिली आहे. डॉ.शंकररावजी चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला ११० करोड रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला. आरक्षणाचे जनक, लोकराजे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचा पावडेवाडी नाका परिसरात भव्य पूर्णाकृती पुतळा उभा करण्यासाठी डी. पी. सावंत यांनी प्रचंड मेहनत घेतली.

आज हा भव्य पूर्णाकृती पुतळा आणि स्मारक नव्या पिढीला प्रेरणा देत आहे. स्त्री शिक्षणाचे उद्गाते राष्ट्रपिता महात्मा जोतीराव फुले आणि आद्य शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या पुतळ्याचे सुशोभीकरण घडवून आणले. अशी दूरदृष्टी असणाऱ्या नेत्याची समाजकारणात आणि राजकारणात नेहमीच गरज असते. डी.पी.सावंत यांच्यासारखे अभ्यासू, प्रामाणिक,स्वच्छ प्रतिमा असणारे व्यक्तिमत्व पुन्हा जनतेलाही हवे आहे. अनेकांच्या यशस्वी जीवनात डी.पी. सावंत यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले आहे. आपणास निरोगी, सदृढ, दीर्घायू, आरोग्य लाभो हीच मनोकामना!!

## खबर हटके

# अन् लग्नासाठी सोनू बनला सोनिया



मुलाशी:सर्वात मोठ्या कॅमेऱ्यातून विश्वाचे पहिले छायाचित्र; मुलाला भूकंपावेळी जीवापेक्षा जेवण महत्त्वाचे

प्रेमाला सीमा नसते

तुम्ही हे नेहमीच ऐकले असेल, पण आता उत्तर प्रदेशातील दोन मुलांनी हे सिद्ध केले आहे. सोनू नावाच्या एका मुलाने त्याचा मित्र प्रेमशी लग्न करण्यासाठी त्याचे लिंग बदलून सोनिया बनला. दरम्यान, पहिल्यांदाच जगातील सर्वात मोठ्या कॅमेऱ्याने विश्वाचे छायाचित्र काढण्यात आले.

उत्तर प्रदेशातील कुशीनगरमध्ये सोनू आणि प्रेम नावाची दोन मुले एकमेकांच्या प्रेमात पडली. भारतात समलिंगी विवाहाला कायदेशीर मान्यता नसल्याने, सोनूने लिंग बदल केला आणि नंतर प्रियकराशी मुलगी बनून लग्न केले. सोनू आणि प्रेम यांनी दीर्घकाळ नात्यानंतर शिव मंदिरात लग्न केले. गावकऱ्यांच्या विरोधामुळे आता दोघेही शहराबाहेर राहत आहेत.

सध्या भारतात समलिंगी विवाहाला कायदेशीर मान्यता नाही. २०२३ च्या एका निर्णयात, सर्वोच्च न्यायालयाने समलिंगी विवाहाला कायदेशीर मान्यता देण्यास नकार दिला. न्यायालयाने म्हटले होते की - विवाह हा मूलभूत अधिकार नाही आणि विशेष विवाह

कायद्यात बदल करणे संसदेच्या अखत्यारीत येते. तथापि, न्यायालयाने समुदायातील लोकांसाठी समान अधिकार आणि सामाजिक स्वीकृतीची आवश्यकता यावर भर दिला होता.


## लाईफस्टाईल

# हार्ट फेल
## होण्याआधी शरीराचे संकेत

हृदयविकाराच्या सततच्या बातम्यांनंतर, आरोग्याची काळजी घेणे खूप महत्वाचे आहे. हृदयविकाराच्या आधी शरीर काही संकेत देते. दुर्दैवाने, बरेच लोक त्याच्या सुरुवातीच्या लक्षणांकडे दुर्लक्ष करतात कारण त्यांना किरकोळ समजतात, जे वेळीच ओळखणे खूप महत्वाचे आहे.

हृदयविकार अचानक होत नाही, ही हळूहळू वाढणारी स्थिती आहे जी तुमच्या जीवनशैली, आजार आणि वैद्यकीय इतिहासावर अवलंबून आहे. जर तुम्हाला उच्च रक्तदाब, मधुमेह, लठ्ठपणा किंवा कौटुंबिक इतिहास यासारख्या जोखीम घटकांचा त्रास असेल, तर वेळीच तुमची तपासणी करा आणि डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार जीवनशैलीत बदल करा.

हृदयविकार ही एक गंभीर स्थिती आहे ज्यामध्ये हृदय शरीराच्या गरजेनुसार पुरेसे रक्त पंप करू शकत नाही. ही समस्या हळूहळू वाढू शकते किंवा अचानकही उद्भवू शकते. दुर्दैवाने, बरेच लोक याच्या सुरुवातीच्या लक्षणांना किरकोळ समजून दुर्लक्ष करतात. परंतु शरीर यापूर्वीच अनेक संकेत देण्यास सुरुवात करते, ज्यांना वेळीच ओळखणे अत्यंत आवश्यक आहे.



हृदयविकार होण्यापूर्वी कोणती लक्षणे दिसतात?

श्वास घेण्यास त्रास चालताना, जिने चढताना किंवा झोपताना सुद्धा श्वास घेण्यास त्रास होतो. सतत थकवा आणि अशक्तपणा हृदयविकाराच्या वेळी शरीराच्या अवयवांपर्यंत ऑक्सिजन आणि पोषक तत्वे पोहोचत नाहीत, ज्यामुळे स्नायूंमध्ये ऊर्जेची कमतरता जाणवते.

पाय, घोटे आणि पोटात सूज जेव्हा हृदय नीट रक्त पंप करू शकत नाही, तेव्हा शरीरात द्रवपदार्थ साठू लागतात.

जलद किंवा अनियमित हृदयाचे ठोके काही वेळा रुग्णाला छातीत जोरजोरात धडधड जाणवते. भूक न लागणे आणि उलटीसारखे वाटणे पचनसंस्थेत बिघाड होऊ लागतो, ज्यामुळे पोट जड वाटते आणि भूक कमी होते.

चक्कर येणे, विसरण्याची समस्या ही लक्षणे विशेषतः वृद्धांमध्ये अधिक दिसतात.

छातीत दुखणे किंवा दबाव जेव्हा हृदयविकारासोबत हृदयविकाराचा झटका येण्याची स्थिती निर्माण होते, तेव्हा तात्काळ वैद्यकीय मदत घेणे आवश्यक आहे.

वेळीच डॉक्टरांचा सल्ला घ्या

हृदयविकाराची लक्षणे सुरुवातीला सौम्य असू शकतात, परंतु कालांतराने ती गंभीर होतात. या सात लक्षणांपैकी कोणतेही लक्षण सातत्याने जाणवत असेल तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. तात्काळ हृदयरोगतज्ज्ञांशी संपर्क साधा आणि आवश्यक तपासण्या करा. वेळीच ओळख आणि उपचारांमुळे हृदयविकार नियंत्रणात ठेवता येऊ शकतो.

**- आरती बोराडे**

## ब्युटी

# फ्रिजच्या पाण्याने चेहरा धुने किती फायद्याचं?

फ्रिजच्या थंड पाण्याने चेहरा धुतल्याने त्वचेला झटपट ताजेतवानेपणा मिळतो, घाम व तेल कमी होतात, पोर्स टाईट होतात व नैसर्गिक ग्लो येतो. मात्र खूप थंड पाण्याचा अतिरेक टाळणं आवश्यक. योग्य पद्धतीने वापरल्यास हे उपाय त्वचेसाठी खूप फायदेशीर ठरतात!

उन्हाच्या प्रखरतेमुळे त्वचेवर ताप जाणवतो, त्वचा कोरडी पडते आणि त्वचेतील ओलसरपणा कमी होतो. अशा परिस्थितीत फ्रिजमधील थंड पाण्याने चेहरा धुतल्यास त्वचेला त्वरित फ्रेशनेस मिळतो. घराबाहेरून घरी आल्यानंतर चेहऱ्यावरचा थकवा आणि उष्णता काही क्षणांतच दूर होते. परिणामी दिवसभर उत्साही आणि ताजेतवाने वाटते.

तसेच, उन्हाळ्यात घाम आणि त्वचेमधील जास्त तेलग्रंथींची क्रिया यामुळे चेहरा वारंवार तेलकट होतो. यामुळे मुरुमं, डाग आणि रॅशेस होण्याचा धोका वाढतो. थंड पाण्याने चेहरा धुतल्याने त्वचेमधील ऑईल सेक्रिशन नियंत्रित राहते आणि चेहरा कोरडा व निरोगी दिसतो.

फ्रिजच्या पाण्याचा आणखी एक मोठा फायदा म्हणजे त्वचेमधील उघडे पोर्स (छिद्रे) नाहीसे होतात. त्यामुळे धुळीचे कण, प्रदूषण किंवा मेकअपचे अवशेष त्वचेत साचण्याचा धोका कमी होतो. यामुळे चेहऱ्याचा रंग



उजळतो आणि त्वचा निरोगी राहते. उन्हाळ्यात अनेकदा चेहऱ्यावर सूज येते किंवा लालसरपणा जाणवतो. विशेषतः डोळ्यांभोवती सूज येणं ही सामान्य तक्रार असते. अशावेळी थंड पाण्याने चेहरा धुतल्याने रक्ताभिसरण सुधारते आणि या लक्षणांपासून आराम मिळतो. काही लोक तर फेस रोलर किंवा आइस क्यूबचा देखील वापर करतात.

याशिवाय, थंड पाण्यामुळे त्वचेचा नैसर्गिक ग्लो टिकतो. महागड्या स्किन केअर प्रोडक्टशिवायही त्वचा ताजी आणि प्रखर दिसते. विशेषतः मेकअप करण्यापूर्वी चेहरा थंड पाण्याने धुतल्यास मेकअप दीर्घकाळ टिकतो आणि चांगल्या प्रकारे बसतो.

मात्र, तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, अति थंड पाणी वापरणे योग्य नाही. पाण्याचा तापमान खूपच कमी असेल तर त्वचेला शॉक लागू शकतो. त्यामुळे फ्रिजमधून पाणी काढल्यानंतर काही वेळ ते खोलीच्या तापमानावर ठेवल्यावरच चेहऱ्यावर वापरणे श्रेयस्कर ठरते. तेलकट त्वचा असलेल्या लोकांनी दिवसातून एक ते दोन वेळा हा उपाय करावा तर कोरड्या त्वचेसाठी याचा वापर अधिक वेळा टाळावा.

नियमित काळजी घेतल्यास फ्रिजच्या पाण्याचा हा सोपा उपाय उन्हाळ्यात त्वचेसाठी वरदान ठरू शकतो. पण अतिरेक टाळा आणि तज्ज्ञांचा सल्ला घ्या.

**- साक्षी कणसे**

## श्रध्दा-संस्कृती

# 'या' खास दिवशी नखे कापा



अनेकदा आपण मोठ्यांकडून हे ऐकले असेल की नखे कापताना विशेष काळजी घेतली पाहिजे. नखे कापण्यासाठी सर्वात शुभ दिवस कोणते असतात आणि कोणते दिवस टाळावे.

**सोमवार:** सोमवार हा नखे कापण्यासाठी चांगला दिवस मानला जातो. हा दिवस भगवान शिव आणि चंद्राशी संबंधित आहे. या दिवशी नखे कापल्याने तमोगुणातून मुक्तता मिळते आणि मानसिक शांती मिळते.

**मंगळवारी:** काही लोक मंगळवारी नखे कापू नयेत असा सल्ला देतात, परंतु कर्जमुक्तीसाठी हा दिवस शुभ मानला जातो. तथापि, हनुमानजींचे व्रत ठेवणाऱ्यांनी या दिवशी नखे कापू नयेत.

**बुधवार:** बुधवार हा नखे कापण्यासाठी खूप शुभ दिवस आहे. या दिवशी नखे कापल्याने आर्थिक लाभ, करिअरमध्ये प्रगती आणि व्यवसायात वाढ होते. हा दिवस विशेषतः व्यावसायिकांसाठी शुभ आहे.

**गुरुवारी:** गुरुवारी नखे कापल्याने सत्वगुण वाढतो आणि सकारात्मक ऊर्जा प्रसारित होते. जरी काही लोक या दिवशी नखे कापणे टाळण्याचा सल्ला देतात, परंतु हा दिवस पवित्रता आणि समृद्धीचे प्रतीक मानला जातो.

**शुक्रवार:** शुक्रवार हा नखे कापण्यासाठी सर्वात शुभ दिवस आहे. या दिवशी नखे कापल्याने देवी लक्ष्मी प्रसन्न होते आणि जीवनात समृद्धी, सौंदर्य आणि संपत्ती वाढते. नातेसंबंध मजबूत करण्यासाठी देखील हा दिवस चांगला मानला जातो.

**शनिवारी:** शनिवारी नखे कापण्याचे टाळावे, कारण यामुळे शनिदेवाला राग येऊ शकतो. या दिवशी मानसिक आणि शारीरिक त्रास होऊ शकतो आणि आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असते. शनीच्या प्रभावापासून वाचण्यासाठी, या दिवशी नखे कापू नका.

**रविवार:** रविवारी नखे कापणे अशुभ मानले जाते. या दिवशी नखे कापणे आत्मविश्वास कमी करते, यशात अडथळा आणते आणि आरोग्यावर वाईट परिणाम करते. म्हणून, रविवारी नखे किंवा केस कापणे टाळावे.



## पासष्ट वर्षाच्या आजी चालवितात गिरणी

**अंबड दि. ३० :** जालना जिल्हयातील अंबड तालुक्यातील पारनेर येथील सुभद्राबाई आसाराम खैरे या पासष्ट वर्षाच्या आजीबाई जालना-अंबड महामार्गावरील पारनेर पेट्रोल पंप येथे पिठाची गिरणी चालवत हाताला चार पैसे मिळविण्यासाठी संघर्ष करत आहे.पारनेर पेट्रोल पंपावर गत चौदा वर्षांपासून सुभद्राबाई खैरे या पिठाची गिरणी चालवतात. तेरा वर्षांपूर्वी त्यांचे पती आसाराम खैरे यांचे निधन झाले. त्यानंतर सुभद्राबाई खैरे यांनी पतीने सूरू केलेला पिठाच्या गिरणीचा व्यवसाय बंद पडू न देता पुढे तसाच आजतागायत सूरू ठेवला आहे. सुभद्राबाई खैरे यांनी आपल्या दैंनदिन कार्यक्रमांचे नियोजन करताना सकाळी नऊ ते रात्री साडे सात यावेळेत पिठाची गिरणी सूरू असते. पिठाच्या गिरणीत दळण दळण्यासाठी पारनेर पेट्रोल पंप, पारनेर, लालवाडीतांडा, लालवाडी, गोविंदपुरसह आदी ठिकाणांहून दळण दळण्यासाठी ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात गर्दी करतात.

## मायलान फार्माचा घोटाळा उघड

**छत्रपती संभाजीनगर दि. ३० :** वाळूज एमआयडीसीतील मायलान फार्मा कंपनीच्या मेडिकल वेस्टमधून एमडी प्रतिबंधित अमली पदार्थासाठी वापरली जाणारी गोळ्यांची पावडर बाहेर पडत असल्याचा प्रकार समोर आला होता. प्रकरणात आता कंपनीच्या कर्मचाऱ्याला देखील अटक करण्यात आली आहे. किशोर शिवाजी पवार (वय ५७) असे अटक केलेल्या कर्मचाऱ्याचे नाव आहे.या प्रकरणात पोलिसांनी यापूर्वी मुख्य आरोपी बबन नजीर खान, त्याची दोन मुले कलीम खान (४१) व सलीम खान (३५), तसेच उत्तर प्रदेशातील दोघे चालक शफीफुल रहमान तफज्जुल हुसेन (४५) आणि राज रामतिरथ अजुरे (३८) यांना अटक केली आहे.

## शेतकऱ्याचा आत्मदहनाचा प्रयत्न

**परळी दि. ३० :** तालुक्यातील सीरसाळा येथील गट क्रमांक ३९० मधील शेतीकडे जाण्यासाठी रस्ता खुला करून द्यावा, या मागणीसाठी १८ मार्च २०२४ रोजी परळी तहसील कार्यालयाकडे निवेदन देण्यात आले होते. मात्र, प्रशासनाने कोणतीही कार्यवाही न केल्याने ३० जून रोजी सकाळी ११.३० वाजता शेतकरी ज्ञानेश्वर उद्धव दहिफळे यांनी थेट तहसील कार्यालयासमोर डिझेल टाकून आत्मदहनाचा धक्कादायक प्रयत्न केला. सुदैवाने, उपस्थित नागरिकांनी व पोलिसांनी वेळेवर हस्तक्षेप करून हा प्रयत्न हाणून पाडला. परंतु, या प्रकारामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

**वनविभाग अलर्ट;** लेणी क्र. २५ जवळ हटवलेली पोळं परत अवतरली

# मधमाश्यांचा अजिंठ्यात पुन्हा कहर

**छत्रपती संभाजीनगर दि. ३० :** जगप्रसिद्ध अजिंठा लेणीत पर्यटकांवर हल्ला करणाऱ्या आग्या मोहळाच्या पोळ्यांचे स्थलांतरण केल्यानंतर रविवारी (दि. २९) पुन्हा २५ पर्यटकांवर या मधमाश्यांनी हल्ला केला. या जखमी पर्यटकांना खासगी रुग्णालयात उपचार घ्यावे लागल्याने हा विषय पुन्हा चर्चेत आला आहे.



**स्थलांतरानंतरही पर्यटकांवर हल्ला**

**अजिंठा लेणीत मधमाश्यांचा पुन्हा हल्ला; २५ पर्यटक जखमी, वनविभागाने पुन्हा पोळ्यांचे स्थलांतरण सुरू केले.**

आग्या मोहोळाच्या माश्यांनी मार्च व जून महिन्यांत पर्यटकांवर तीन ते चार वेळा हल्ला चढविला होता. यामध्ये मोठ्या संख्येने पर्यटक जखमी झाले होते. त्यानंतर पुरातत्त्व व वन विभागाने कार्यवाही करून १० जून रोजी लेणी क्र. दहा व इतर ठिकाणी असलेले संपूर्ण पोळे हटविले होते. काही ठिकाणी मधमाश्यांचे छोटे पोळे अजूनही शिल्लक असल्याचे रविवारी पुन्हा दिसून आले. रविवारी दुपारी साडेतीन वाजता लेणी क्र. २५ जवळ या माश्या पुन्हा अवतरल्या व त्यांनी २५ पर्यटकांवर हल्ला केला. संपूर्ण लेणीच जंगलात असल्याने येथे मधमाश्यांचा अधिवास पूर्वाश्रमीचा आहे. पर्यटकांसाठी धोकादायक ठरलेली पोळे पूर्णत: काढली आहेत, तरीही आज या माश्या परतल्याने त्याकडे लक्ष केंद्रीत केले जाईल. परिसरात अजून कोठे-कोठे पोळे आहेत, याचीही पाहणी करून त्यांचेही स्थलांतरण केले जाणार असल्याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष दोडके यांनी दिली आहे.

# चॉकलेटसाठी पैसे मागितल्याचा राग

## पित्याने गळफास देत केला चिमुकलीचा खून

**उदगीर दि. ३० :** चॉकलेटसाठी पैसे मागणारी चार वर्षीय मुलगी आरुषीचा जन्मदात्याने साडीने फाशी देत खून केल्याची घटना भीमा तांडा (ता. उदगीर) येथे रविवारी दुपारच्या सुमारास घडली. याबाबत उदगीर ग्रामीण पोलिस ठाण्यात आरोपी पित्याविरोधात रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



**आरोपीला अटक, तपास सुरू**

**आरोपी पिता बालाजी राठोड विरुद्ध गुन्हा दाखल झाला असून पोलिसांनी त्याला अटक केली आहे.**

पोलिसांनी सांगितले, फिर्यादी वर्षा बालाजी राठोड हिचा विवाह २०१९ मध्ये भीमा तांडा येथील बालाजी बाबू राठोड याच्यासोबत झाला होता. दरम्यान, त्यांना एक मुलगा आर्यन, एक मुलगी आरुषी अशी दोन अपत्ये झाली. फिर्यादीचा पती बालाजी बाबू राठोड याला दारूचे व्यसन जडले होते. तो दारू पिल्यावर पत्नीला मारहाण करून मुलांना जीवे मारण्याची धमकी देत होता. दरम्यान, ९ जून रोजी पती बालाजी हा सासरवाडीत जाऊन मुलगी आरुषीला जबरदस्तीने भीमा तांडा येथे घेऊन आला होता. रविवारी दुपारी २:३० वाजण्याच्या सुमारास पत्नी वर्षा यांच्या काकाच्या मोबाईलवर सासू मंगलबाई बाबू राठोड हिने फोन करून सांगितले. तुझा पती बालाजी याने मुलगी आरुषी हिला राहत्या घरात साडीने फाशी देत ठार मारले आहे. मुलीला उदगीर येथील शासकीय रुग्णालयात नेले आहे. ही घटना कळल्यानंतर फिर्यादी पत्नी वर्षाने उदगीर येथील रुग्णालयात धाव घेतली.

# मुलीवर अन्याय थांबवा

## धनंजय मुंडेंची अधिवेशनात भूमिका

**बीड दि. ३० :** बीडमध्ये कोचिंग क्लासेसमध्ये पाच हजार विद्यार्थी शिकतात. त्यात किती मुलांचे लैंगिक शोषण झाले याची एसआयटी चौकशी व्हावी, अशी मागणी आपण अधिवेशनात करणार असल्याचे माजी आमदार धनंजय मुंडे यांनी सांगितले.

मुलीच्या अत्याचारप्रकरणी विजय पवार याच्यावर गुन्हा नोंद झाल्यानंतर रात्री ११च्या सुमारास तो आमदार संदीप क्षीरसागर यांच्यासोबत होता, असा आरोपही मुंडे यांनी रविवारी केला. यावेळी धनंजय मुंडे यांनी पीडित मुलीच्या घरी भेट दिल्यानंतर पत्रकारांशी संवाद साधला.

**अशा वृत्तीला ठेचून काढले पाहिजे**

**मी मुद्द्याचे भांडवल किंवा देखावा करत नाही. पीडितांना न्याय मिळाला पाहिजे, हेच माझे कर्तव्य आहे. जिथे अन्याय होईल तिथे नक्कीच मी उभा असेल. मग तो कोणीही असेल, अशी वृत्ती ठेचून काढली पाहिजे, असे मत खासदार बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केले.**

## साखर उत्पादनात ३५ लाख टन वाढ

**धाराशिव दि. ३० :** मागील वर्षी राज्यात चांगला पाऊस झाला. त्यामुळे मागील वर्षीच्या तुलनेत ऊस क्षेत्रात एक लाख हेक्टरने वाढ झाली आहे. याशिवाय मागील मे महिन्यात पावसाने दमदार हजेरी लावल्याने त्याचाही ऊस पिकाला चांगला फायदा झाला आहे. परिणामी यंदा राज्यातील साखर उत्पादनही ३० ते ३५ लाख टनांनी वाढण्याची चिन्हे आहेत.

२०२४ मध्ये राज्यात दमदार पाऊस झाला होता. परिणामी मागील खरीप हंगामाअखेर शेतकऱ्यांनी ऊस लागवडीला प्राधान्य दिले.

# शिक्षणासाठी रोज करावा लागतो विद्यार्थ्यांना जीवघेणा संघर्ष

**फुलंब्री दि. ३० :** तालुक्यातील बाबरा परिसरातील वाघ वस्ती व पवार वस्तीला जोडल्या जाणाऱ्या ३ किलोमीटर रस्त्यासाठी ग्रामस्थांना अनंत अडचणींचा सामना करावा लागतो. कमरेपर्यंतच्या पाण्यातून वाट शोधावी लागत आहे.



निधोना रस्ता परिसरातील वाघ व पवार शेत वस्तीवरील नागरिकांना गावात जाण्यासाठी रस्ताच नाही. दोन्ही वस्ती मिळून ५० च्या जवळपास घरे असून २५० लोकसंख्या आहे. दीडशे शाळकरी मुलांना शिक्षणासाठी बाबरा गावात जाण्यासाठी रस्ताच नाही.मुलांना शाळेत जाण्यासाठी चार ठिकाणी पूल नसलेले नाले ओलांडून जावे लागते. वस्तीवर एक वस्तीशाळा सुद्धा आहे. येथील नागरिकांचा व्यवसाय शेती सोबत जोडधंदा दुग्ध व्यवसायाचा असून नदी नाल्यांना पूर आल्यानंतर नाला ओलांडून जाता येत नसल्याने पन्नास ते शंभर लिटर दुध फेकल्याशिवाय दुग्ध व्यवसायिकांना काही पर्यायच उरत नाही.

## २२ दिव्यांगांची पायी वारी

**परळी वैजनाथ दि. ३० :** विठ्ठलाच्या ओढीने हरिनामाचा गजर करीत राज्याच्या कानाकोपऱ्यातून लाखो वारकरी पंढरपुरात दाखल होत आहेत. त्यात दिव्यांगही मागे नाहीत. यवतमाळहून पंढरपूरला दिव्यांगांची वारी निघाली आहे. पूर्णत: दिव्यांगांची पंढरपुरात जाणारी ही एकमेव स्वतंत्र वारी आहे. येथे ती येताच जोरदार स्वागत करण्यात आले. मुक्कामादरम्यान सहभागी वारकऱ्यांना वैद्यनाथ भक्तमंडळाच्या वतीने सेवा पुरवण्यात आली.

**गुन्हेगारीचा तडाखा;** चाकू, दगडांनी पती-पत्नीला मारहाण

# बीडमध्ये कुटुंबावर टोळक्याचा हल्ला

**बीड दि. ३० :** बीड शहरात पुन्हा एकदा गुन्हेगारीने टोक गाठले आहे. शाहूनगर भागातील गजानन कॉलनीमध्ये तब्बल ३० ते ४० जणांच्या टोळक्याने एका कुटुंबावर रविवारी मध्यरात्री हल्ला चढवत दगड आणि चाकूचा वापर करून बेदम मारहाण केली. या हल्ल्यात दिनकर आडागळे आणि त्यांच्या पत्नी रेणुका आडागळे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



काही तरुणांशी आडागळे कुटुंबाच्या मुलाचा पूर्वी वाद झाला होता. त्याच रागातून हे टोळके रात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास त्यांच्या घरात शिरले. "तुमचा मुलगा कुठे लपलाय?" असा जाब विचारत आरोपींनी चाकूचा धाक दाखवून घरातील साहित्याची तोडफोड केली आणि कुटुंबीयांना बेदम मारहाण केली. आडागळे यांच्या मुलीवर देखील चाकू उगारण्यात आल्याचा आरोप आहे.या घटनेनंतर परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणी अद्याप गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. कुटुंबीयांनी आपल्या मुलाच्या जीवाला धोका असल्याची तक्रार करून तातडीने कारवाईची मागणी केली आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वीच मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येने बीड हादरून गेला होता. अशातच पुन्हा घडलेली ही घटना कायदा आणि सुव्यवस्थेच्या प्रश्नांकडे बोट दाखवते.

## पावसाअभावी काही भागात पेरणी रखडली

**परभणी दि.३० :** परभणी जिल्ह्यात आतापर्यंत २ लाख ८९ हजार ५ हेक्टरवर, तर हिंगोलीत २ लाख २२ हजार ५९९ हेक्टरवर खरिपाची पेरणी झाली आहे. कपाशी व सोयाबीनची सर्वाधिक लागवड झाल्या आहेत. वाढीच्या अवस्थेतील पिकांना पावसाची गरज असून काही ठिकाणी दुबार पेरणीची वेळ आली आहे.



# फुलांचा वर्षाव, भक्तीचा सागर

**भूम दि. ३० :** आदिशक्ती मुक्ताईच्या पालखी सोहळ्यावर आष्टा गावातील ग्रामस्थांच्या वतीने जेसीबीच्या साह्याने पुष्पवृष्टी करत जोरदार स्वागत केले. भूम येथील मुक्काम उरकून पांडुरंगाच्या भेटीला निघालेल्या आदिशक्ती मुक्ताई पालखीचे आष्टा येथे आगमन होताच संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणात न्हाल्याचे अद्भुत दृश्य पाहायला मिळाले. ग्रामस्थांनी हृदयातून आलेल्या भक्तिभावासह फुलांची उधळण केली, आणि टाळ-मृदंगांच्या लयात मुक्ताईचे जंगी स्वागत केले.

भक्तांचा सकाळच्या पहिल्या किरणांपासूनच यथाशक्ती संचय सुरू झाला; हजारो भाविक यांनी पालखी मार्गावर एकत्र येऊन अद्वितीय सजावट केली. लहान मोठ्या फुलांचे तोरण, रंगीत रांगोळ्या आणि भव्य ध्वजारोहण यांच्यातून शक्तीची महत्त्वाची जाणीव लोकांना झाली.



**आष्टा येथे मुक्ताई पालखीचे भक्तिपूर्ण स्वागत; ग्रामस्थांनी फुलांची उधळण करत टाळ-मृदंगात रंगला सोहळा**

# वारीत चिमुरडीने गायली भक्तीमय गवळण

## जालन्यातील शिवानी शिंदेंचा आवाजसोशल मीडियावर व्हायरलय

**जालना दि. ३० :** सध्या आषाढी एकादशीनिमित्त महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भाविक विठ्ठलाच्या दर्शनासाठी टाळ-मृदंगाच्या गजरात पंढरपूरकडे मार्गस्थ होत आहेत. यात विविध वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवला आहे. हे विद्यार्थी कीर्तन, भजन आणि विठ्ठलाचा जयघोष करीत तल्लीन होताना दिसत आहेत. यातच आळंदी देवाची येथील राजमाता मुलींची वारकरी शिक्षण संस्थेची इयत्ता सातवीमध्ये शिक्षण घेणारी मूळ जालना जिल्ह्यातील परतूर तालुक्यातील हातडी येथील शिवानी रामदास शिंदे हिने "रडू नको बाळा, मी पाण्याला जाते, पाणी घेऊन येते आणि तुला लोण्याचा गोळा खायला देते" ही गवळण गायली. त्यानंतर या गवळणचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

सध्या विठ्ठलाच्या दर्शनासाठी लाखो दिंड्या पंढरपूरकडे मार्गस्थ होत आहेत. यादरम्यान, आळंदी ते पंढरपूर मार्गावर आयोजित प्रदर्शनात राजमाता मुलींची वारकरी शिक्षण संस्थेच्या मुलीही सहभागी झाल्या होत्या. यावेळी दिंडीतील एका व्यक्तीने शिवानीचा व्हिडीओ काढून २३ जून रोजी सोशल मीडियावर अपलोड केला. सुमधुर आवाजातील या गवळणचा व्हिडीओ प्रचंड व्हायरल झाला असून, दोन लाखांच्यावर नेटकऱ्यांनी तो पाहिला असून लाइक, कमेंटकरून शिवानीचे सर्वजण कौतुक करत आहेत.

**सुरांनी मोहरली वारी**

**आषाढी वारीदरम्यान आळंदी-पंढरपूर मार्गावर सातवीत शिकणाऱ्या जालना जिल्ह्यातील शिवानी शिंदे हिने भर पावसात गायलेली गवळण सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे. तिच्या सुमधुर आवाजातील "रडू नको बाळा..." या गवळणचे लाखोंनी कौतुक केले आहे.**

## शिक्षकाकडून अभंगांची एक हजारवारी

**परभणी दि. ३० :** वारी सुरू होताच मनातील भाव ते कागदावर उमटवितात. गेल्या अकरा वर्षांपासून त्यांचा हा उपक्रम सुरू आहे. या काळात त्यांनी सुमारे १ हजार ४१९ अभंग लिहिले आहेत. दिलीप चारठाणकर असे त्यांचे नाव आहे. ते शिक्षक आहेत.

वारी सुरू झाली की रोज एक अभंग लिहायचा असा संकल्प चारठाणकर यांनी २०१४ मधील आषाढी वारीपासून केला. हे व्रत त्यांनी दरवर्षी सुरू ठेवले आहे.


**भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखाना लि; लक्ष्मीनगर, देगाव-येळेगाव, ता.अर्धापुर, जि. नांदेड**

दूरध्वनी क.९८८११९८७९९ व ९८८११७७६९९ Website: www.bhauraosugar.com

E-mail : nnd_saisugarlaxmi@rediffmail.com, saisugarlaxmi@gmail.com

**"निविदा सुचना"**

आमचे कारखान्याचे युनिट क्र.१ लक्ष्मीनगर येथे सिव्हील कामे करावयाची आहेत. सदरील कामाचे कोरे निविदा मुख्य कार्यालय लक्ष्मीनगर येथे दि.०१.०७.२०२५ ते दि.०५.०७.२०२५ रोजीपर्यत दुपारी ५.०० पर्यत उपलब्ध राहतील. भरलेली निविदा सोमवार दि.०७.०७.२०२५ पर्यत कार्यालयीन वेळेत (सकाळी १०.०० ते सांय . ५.३० वाजेपर्यंत)पोहोच करण्यात यावी.

| Sr.No. | Name of work | Tender E.M.D | Tender Fees |
|---|---|---|---|
| 01. | Maintenance work of Equilisation Tank. | 7700/- | 500/- |

कारखान्यास प्राप्त कोणतीही निविदा/दरपत्रके स्विकारण्याचा/नाकारण्याचा अधिकार कारखान्याने राखुन ठेवला आहे.

**कार्यकारी संचालक** **चेअरमन**



**भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखाना लि., लक्ष्मीनगर, देगांव-येळेगांव, ता.अर्धापुर. जि.नांदेड**

**जाहिर नोटीस**

(भाग हस्तांतरणाबाबत)

जाहिर नोटीस देण्यात येते की, आमचे कारखान्याचे खालील सभासद मयत झाल्याने त्यांचे भाग हस्तांतर करण्यास खालील दर्शविलेल्याप्रमाणे त्यांच्या वारसदारांनी कारखान्याकडे रितसर अर्ज केलेले आहेत.

| अ.क्र. | कोड नंबर | मयत सभासदाचे नांव | गांव | रक्कम | वारसदाराचे नांव | वय वर्ष | मयताशी नाते | हस्तांतरण फी भरणा दि |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 61814 | दिगंबर दत्तराव देशमुख | वाडी मुक्त्यारपूर | 15000 | रामराव दिगंबरराव देशमुख | 59 | मुलगा | 03.02.2025 |
| 3 | 2122 | शंकर कृष्णराव सरदेशपांडे | पाथरड हिस्सा | 15000 | संतोष शंकरराव सरदेशपांडे | 57 | मुलगा | 07.02.2025 |
| 2 | 2335 | अशोक रामजी कपाटे | येळेगांव | 15000 | सुनिता अशोक कपाटे | 45 | पत्नी | 28.04.2025 |
| 4 | 1797 | डिगंबर अमृतराव देशमुख/कल्याणकर | पिंपळगांव म. | 15000 | कस्तुरा डिगंबर कल्याणकर | 40 | पत्नी | 07.06.2025 |
| 5 | 10240 | वच्छलाबाई पुंडलिकराव शिंदे | कासारखेडा | 15000 | शुभम नागोराव शिंदे | 29 | नातू | 11.06.2025 |

वरिल सभासदांनी सर्व कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे. महाराष्ट्र राज्य स्टेट को-ऑपरेटीव्ह सोसायटी अ‍ॅक्ट १९६० कलम ३० व नियम २५(३) ला अनुसरून त्यांचे शेअर्स व ठेव हस्तांतर करावयाचे आहे. तरी या संबंधात कुण्याही व्यक्तीला काही तक्रार व हक्क असतील तर त्यांनी कागदपत्रे पुराव्यासहीत ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाचे आत कारखान्याचे ऑफिसमध्ये प्रत्यक्ष येवुन आपले हक्कासंबंधी पुरावा सिध्द करावा. अन्यथा अर्जदाराच्या मागणीप्रमाणे शेअर्स व ठेव व इतर येणे-देणे बाकी हस्तांतर केले जाईल व त्यानंतर कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही. याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

**(एस.आर.पाटील)** कार्यकारी संचालक

**(नरेंद्र भगवानराव चव्हाण)** अध्यक्ष



नोंदणी क्र: एनएनडी/एनएनडी/पीआरजी(ए) एस-४२/१९९०,दि. २६ जुलै, १९९०

**भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखाना लि;**

लक्ष्मीनगर, देगाव-येळेगाव, ४३१६०५, ता.अर्धापुर, जि. नांदेड

Phone No. 9881198799, 9881177699 E-mail : nnd saisugarlaxmi@rediffmail.com, saisugarlaxmi@gmail.com

**खुली साखर/मोलासेस/स्पिरीट/बगॅस/राख/प्रेसमड विक्री टेंडर**

आमच्या कारखान्याचे युनिट क्र. १ व २ ची उत्पादीत साखर २०२४-२५ मधील साखर विक्री करावयाची असून, सर्व घाऊक साखर परवानाधारकांकडून साखर विक्री टेंडर्स मागविण्यात येत आहेत. तरी सर्व घाऊक परवानाधारक व्यापाऱ्यांनी खालील निश्चित केलेल्या ठिकाणी व वेळी प्रत्यक्ष हजर राहावे व साखर टेंडर सादर करावेत. तसेच हंगाम २०२४-२५ मधील उत्पादीत मोलासेस/ स्पिरीट / बगॅस/ राख/प्रेसमड विक्री करावयाचा आहे.

| टेंडर तारीख | वार | वेळ | ग्रेड | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| ०३.०७.२०२५ | गुरूवार | सायं. ७.०० वा. | एस व एम-३० | हॉटेल उमा, शिवाजी नगर, नांदेड/ कारखाना साइट, लक्ष्मीनगर |
| ०७.०७.२०२५ | सोमवार | | | |
| १०.०७.२०२५ | गुरूवार | | | |
| १४.०७.२०२५ | सोमवार | | | |
| १७.०७.२०२५ | गुरूवार | | | |
| २१.०७.२०२५ | सोमवार | | | |
| २४.०७.२०२५ | गुरूवार | | | |
| २८.०७.२०२५ | सोमवार | | | |
| ३१.०७.२०२५ | गुरूवार | | | |

नोट : टेंडर तारखेमध्ये काही अपरिहार्य कारणास्तव बदल झाल्यास अथवा टेंडर रद्द झाल्यास पुढील टेंडरची तारीख आपणांस वेळीच कळविण्यात येईल.

अ) साखर विक्री अटी व शर्ती :

०१. टेंडर सोबत प्रती क्विंटल रु.१००/-साखर खरेदीपोटी डिपॉझीट रोख/डि.डि.द्वारेभरणा करावी लागेल.
०२. मंजुर झालेली पोती दिलेल्या मुदतीत उचलणे आवश्यक आहे. मुदतीत साखर नाही उचलल्यास व्याज व टदंडाची रक्कम खरेदीदारा कडून वसुल करण्यात येइल.
०३. इतर शर्ती व अटी टेंडर फॉर्ममध्ये नमुद केल्याप्रमाणे राहतील.
०४. टेंडर स्विकारण्याचा अगर नाकारण्याचा अधिकार कारखान्याचे व्यवस्थापनाने राखून ठेवला आहे.

ब) मोलासेस/स्पिरीट/बगॅस/राख/प्रेसमड विक्री अटी व शर्ती :

०१. आपणांस मोलासेसं/स्पिरीट/बगॅस/राख/प्रेसमड खरेदीपोटी कारखान्याकडे EMD रक्कम अ‍ॅडव्हॉन्स भरणा करावा लागेल.
०२. मोलासेस/स्पिरीट/बगॅस/राख/प्रेसमड भरून घेण्यासाठी वाहन व मजुराची व्यवस्था स्वतः करावी लागेल.
०३. नियमाप्रमाणे मोलासेस/स्पिरीट/बगॅस/राख/प्रेसमड खरेदीदारास लागणाऱ्या कागदपत्राची पुर्तता करुन द्यावी लागेल

**एस.आर. पाटील** कार्यकारी संचालक | **अ‍ॅड.सुभाष कल्याणकर** साखर समिती अध्यक्ष | **नरेंद्र चव्हाण** अध्यक्ष

## थोडक्यात

### व्यसनमुक्ती मार्गदर्शन केंद्राची स्थापना

**नांदेड,दि. ३० :** नशाबंदीबाबत जनजागृती व प्रशिक्षण या अभियानाचा एक भाग म्हणून डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, विष्णुपूरी येथील बाह्यरुग्ण विभागात दंतशल्यचिकित्सा विभागामधील तंबाखू प्रतिबंध केंद्रामध्ये व्यसनमुक्ती मार्गदर्शन केंद्राची स्थापना २८ जून रोजी करण्यात आली. या केंद्राचे उद्घाटन अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.

### जोंधळे यांची स्थानिक गुन्हे शाखेत नियुक्ती

**भोकर,दि.३० :** पोलीस दलात महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या स्थानिक गुन्हे शाखेसाठी यंदा पहिल्यांदाच शंभर गुणाची परीक्षा घेण्यात आली जिल्ह्यातील अनेकांनी परीक्षेत सहभाग घेतला पण अवघे २० पोलीस कर्मचारी उत्तीर्ण झाले असून त्यांना स्थानिक गुन्हे शाखेत नियुक्ती देण्यात आली त्यात येथील प्रमोद जोंधळे यांचा समावेश आहे. या निवयुक्तीबदल त्यांचा माजी उपनगराध्यक्ष शेख युसुफ मित्रमंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

### तीन संशयित दरोडेखोरांना अटक

**धर्माबाद,दि.३० :** दरोडा टाकण्याच्या तयारीने लोखंडी रॉड, काठी इत्यादी शस्त्र घेऊन संशयितरित्या रत्नाळी हनुमान मंदिरजवळ दबाधरुन बसलेल्या शेख इमरोज शेख अब्दुल रजाक, महमद साहिल मो.साब आणि शेख अस्लम नासीफ रा.वाजेगाव नांदेड या तिघांना धर्माबाद पोलिसांनी अटक करुन त्यांच्याविरुध्द पोलीस स्थानकात गुन्हा दाखल केला आहे.

### मारहाण करुन जखमी केले

**नांदेड,दि.३० :** रविवारी रात्री ३ च्या सुमारास शास्त्रीनगर येथील खंडेलवाल स्वीटमार्ट समोर अज्ञात चार आरोपींनी चौफाळा येथील मोहमद मुजमीलोद्दीन मो. हबीबोद्दीन यांना अज्ञात कारणावरुन लोखंडी रॉड व दगडानी मारहाण करुन गंभीर जखमी केले. या प्रकरणी इतवारा पोलीस ठाण्यात आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### प्राण्यांना क्रूरपणे वागणूक;गुन्हा दाखल

**धर्माबाद,दि.३० :** शहरातील बन्नाळी महादेव मंदिराजवळ आरोपी संजय निदानकर, चंद्रप्रकाश बनसोडे हे विनापरवाना बेकायदेशीररित्या १ गाय व कालवड एकूण किंमत २४ हजार रुपये या प्राण्यांना क्रूरपणे वागणूक देत पायी ओढत घेवून जात असताना आढळून आल्यामुळे त्यांच्याविरुध्द प्राणी संरक्षण अधिनियमासह धर्माबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### शेतकऱ्याची आत्महत्या

**हदगाव,दि.३० :** तालुक्यातील सावरमाळ येथील शेतकरी भगवान यादवराव माधववाड यांनी आपल्या शेतशिवारात गळफास घेऊन आत्महत्या केली. सततची नापिकी आणि बँकेचे घेतलेले कर्ज कसे फेडावे? या विवंचनेत त्यांनी गळफास घेतला.या बाबत नारायण माधववाड यांनी दिलेल्या माहितीवरुन मनाठा पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

## जिल्हा परिषदेला लाखोंचे वीजबिल!

# एक कोटींचा सोलार प्रकल्प धुळखात

**नांदेड दि. ३०: केंद्र व राज्य शासन सौरऊर्जेला प्रोत्साहन तसेच शासकीय कार्यालये वीज बिल मुक्त व्हावीत या दिशेने काम करीत असतांना आपल्या जिल्हा परिषदेकडून मात्र पूर्ण दुर्लक्ष केले जात आहे.**



जिल्हा परिषदेच्या मुख्य इमारतीवर तब्बल एक कोटी रुपयांचा खर्च करून सोलार यंत्रणा बसवण्यात आली, मात्र गेली दोन वर्षे ती वापरातच नाही. कारण केवळ तांत्रिक कनेक्शनचं काम प्रलंबित आहे. परिणामी, जिल्हा परिषदेला दरमहा सात ते आठ लाखांचं वीजबिल भरण्याची वेळ येत आहे. केंद्र व राज्य शासन सौरऊर्जेला प्रोत्साहन देत असतानाही नांदेड जिल्हा परिषदेकडून मात्र पूर्ण दुर्लक्ष केलं जात आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य इमारतीवर तब्बल एक कोटी रुपयांचा खर्च करून सोलार यंत्रणा बसवण्यात आली, मात्र गेली दोन वर्षे ती वापरातच नाही. कारण केवळ तांत्रिक कनेक्शनचं काम प्रलंबित आहे. परिणामी, जिल्हा परिषदेला दरमहा सात ते आठ लाखांचं वीजबिल भरण्याची वेळ येत असून, अद्यापही हा सोलार प्रकल्प धुळखात पडून आहे.शासकीय कार्यालयांना सौरऊर्जा वापरण्याचे आदेश असताना, जिल्हा परिषदेचे दुर्लक्ष चर्चेचे कारण ठरले आहे. दोन वर्षांपूर्वी जिल्हा परिषदेच्या इमारतीवर एक कोटी रुपये खर्च सोलर यंत्रणा बसवण्यात आली. गुत्तेदाराला बिल सुद्धा अदा करण्यात आले. केवळ कनेक्शन न दिल्यामुळे यंत्रांना बंद अवस्थेत आहे .दर महिन्याला जिल्हा परिषद इमारतीचे सात ते आठ लाख रुपये वीज बिल येते सोलार यंत्रणा न चालू केल्यामुळे दोन वर्षांपासून हे वीज बिल जिल्हा परिषदेला भराव लागत आहे. त्यामुळे बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करून त्यांच्याकडून वीज बिल वसूल करण्याची मागणी विविध पक्षसंघटनांकडून करण्यात आली. या प्रकारामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये रोष आहे.

प्रशासनाच्या बेजबाबदार पणामुळे शासनाच्या लाखोंच्या योजना हवेत विरून जात असल्याची टीका होत आहे. शासनाच्या निधीचा वापर हा जनतेच्या हितासाठी व्हावा, यासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य अधिकाऱ्यांनी याची गंभीर दखल घेणे गरजेचे आहे.

# छ.शिवाजी महाराज पुतळा ते वजिराबाद चौक वाहतूक आजपासून १५ दिवस बंद

## मुथा चौक ते महावीर चौक पर्यायी मार्ग दुहेरी वाहतुकीसाठी खुला

**नांदेड,दि.३० –** शहरातील रस्त्याच्या मजबुतीकरण आणि सिमेंट कॉंक्रिटचे काम सद्या वेगात सुरू असल्याने छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा ते वजिराबाद चौक दरम्यानच्या मार्गावरील वाहतूक उद्या मंगळवार दि.१ जुलै ते १५ जुलै पर्यंत असे १५ दिवस पूर्णतः बंद ठेवण्यात येणार आहे.

दैनंदिन वाहतूक आणि रहदारीसाठी मुथा चौक ते महावीर चौक हा पर्यायी मार्ग म्हणून दुहेरी वाहतुकीसाठी खुला करण्याचे आदेश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सोमवारी (दि.३०) निर्गमित केले आहेत.

नांदेड शहरातील रेल्वे स्टेशन–शिवाजी पुतळा – मुथा चौक – महावीर चौक – गुरुद्वारा चौक – जुना मोंढा–बर्की चौक – पैलवान टी हाऊस देगलूर नाका लिंक रस्ता क्रमांक १ या रस्त्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कॉंक्रीटीकरण करण्याचे काम सद्या प्रगती पथावर असून कामातील भाग १६३ मधील शिवाजी महाराज पुतळा ते मुथा चौक (१४० मी.) या भागात रस्त्याचे काम करतांना पाणी पुरवठा नळांची अडचण येत आहे. त्यामुळे महानगरपालिकेकडून पाणी पुरवठा लाईनचे व रस्त्याचे काम समांतर पुर्ण करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते मुथा चौक ह्या मार्गावरील वाहतूक पुर्णतः बंद केली आहे. तथापि या मार्गातील मुथा चौक ते महावीर चौकापर्यंत एकेरी रस्त्याचे काम पूर्ण होईपर्यंत दुहेरी मार्ग घोषित करण्यात आला आहे.

त्यानुसार जिल्हा दंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम ११५ मधील तरतुदीनुसार प्रदान केलेल्या अधिकारान्वये संबधीत सर्व विभागाने आवश्यक त्या उपाययोजना करुन उद्या मंगळवार दि.१ जुलै ते दि.१५ जुलै या कालावधी पर्यंत वर नमूद केलेल्या पर्यायी मार्गाने सर्व प्रकारची वाहने वळविण्यास मान्यता दिली आहे.

# हदगाव–तामसा शाळांतील उर्दूचे विद्यार्थी अद्यापही पुस्तकापासून वंचित

**हदगाव,दि.३० :** हदगाव व तामासा येथील पीएमश्री दर्जा प्राप्त जिल्हा परिषद हायस्कूल प्रशालेतील उर्दू माध्यमातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सत्र सुरु होऊन पंधरवडा उलटूनही अद्यापही पाठ्यपुस्तके मिळाली नसल्याने त्यांच्या अभ्यासावर परिणाम होत आहे. इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना पुस्तकांशिवाय शिक्षण घेण्याची वेळ आल्याने पालकांमध्ये संतापाची भावना आहे.

या संदर्भात संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी हदगाव गट शिक्षण विभागाला लेखी पत्र देऊन वस्तुस्थिती कळवली असली तरीही अद्याप शिक्षण विभागाने कोणतीही ठोस कारवाई केली नाही. शासनाने शाळेच्या पहिल्या दिवशीच दोन गणवेश व सर्व पाठ्यपुस्तकांचे वितरण होईल, अशी ग्वाही दिली होती. मात्र उर्दू माध्यमातील विद्यार्थ्यांचे अद्यापही पुस्तकांपासून वंचित राहणे हे गंभीर अनागोंदीचे उदाहरण ठरत आहे. शाळा उत्साहात सुरू झाली असली तरी शिकवणी अध्यापनासाठी आवश्यक असलेल्या पुस्तकां शिवाय वर्ग चालवण्याची मोठी अडचण निर्माण झाली आहे. ''शिकवायचं काय आणि शिकायचं काय?'' असा प्रश्न शिक्षक व पालकांना सतावतो आहे. यामुळे उर्दू माध्यमाच्या विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक नुकसान होत असल्याची ओरड होत आहे.

# संजय वारकड नांदेडचे तहसीलदार



**नांदेड,दि.३० :** महाराष्ट्र शासनाच्या तहसीलदार संवर्गातील अधिकाऱ्यांना प्रशासकीय कारणास्तव सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने पदस्थापना देण्यात आली असून येथील तहसील कार्यालयातील संजय गांधी योजनेचे तहसीलदार संजय वारकड यांची नांदेडचे तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. बदली आदेशात संजय वारकड यांनी तत्काळ पदस्थापनेच्या पदावर रुजू व्हावे असे नमूद करण्यात आले आहे.

# जिल्ह्यात ४ जुलैपर्यंत यॅलो अलर्ट घोषित

**नांदेड, दि. ३० :** प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र मुंबई यांनी ३० जून रोजी दुपारी दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी ३० जून, ०१ जुलै, ४ जुलै या तीन दिवसासाठी यलो अलर्ट जारी केलेला आहे.

३० जून ह्या दिवशी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह मुसळधार पाऊस व १ जुलै व ४ जुलै हे दोन दिवस जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ३० ते ४० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणि जनतेने खबरदारी घ्यावी. नागरिकांनी खबरदारीची उपाययोजना म्हणून पुढील प्रमाणे काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीत गैरव्यवहार करणाऱ्या ग्रामसेवकाला जि.प.चे अभय!

**नायगाव, दि. ३० :** तालुक्यातील कहाळा बु. येथे १५ वित्त आयोगाच्या निधीत आडीच लाखाचा अपहार झाल्याची चार महिण्यापूर्वी घडली. या अपहाराला जबाबदार असलेले ग्रामसेवक एस.जी. कदम यांच्यावर कारवाई करण्यात यावी यासाठी पंचायत समितीने जिल्हा परिषदेकडे अहवालही पाठवला. मात्र जिल्हा परिषदेकडून भ्रष्टाचारी ग्रामसेवकाला पाठबळ देण्याचे काम होत असल्याने तालुक्यात संताप व्यक्त होत आहे.

नायगाव तालुक्यातील कहाळा (बु.) येथील ग्रामपंचायतचे ग्रामसेवक व सरपंचांनी विविध विकास कामात भ्रष्टाचार केला असल्याची तक्रार झाली होती. त्यानुसार नायगाव पंचायत समितीच्या वतीने तक्रारीतील मुद्देनिहाय चौकशी करण्यासाठी एक समिति गठीत केली होती. समितीने केलेल्या चौकशीत तत्कालीन ग्रामसेवक एस.जी. कदम यांनी सरपंचाच्या संगनमताने १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतील विविध कामे अंदाजपत्रकातील तरतुदीनुसार न करता निकृष्ट दर्जाची करुन २ लाख ४६ हजाराचा अपहार केल्याचे फेर मुल्यांकनात आढळून आले. ग्रामपंचायतचे सचिव म्हणून त्यांनी सोपवण्यात आलेली जबाबदारी योग्यरीत्या पार पाडली नाही. त्यामुळे महाराष्ट्र जिल्हा परिषद सेवा वर्तणूक नियम १९६७ चा भंग केल्या प्रकरणी दोषी आढळून आले त्यामुळे कदम शिक्षेस पात्र आहेत. त्यांच्यावर पुढील कारवाई करण्यासाठी नायगाव पंचायत समितीने जिल्हा परिषदेच्या पंचायत विभागाला (दि.६) फेब्रुवारी रोजी अहवाल पाठवला होता.मात्र त्या अहवालाची अद्याप तरी दखल घेतली नाही.त्यामुळे ग्रामसेवकास जि.प.चे अभय असल्याची ओरड होत आहे.

**कारवाईसाठीचा प्रस्ताव जिल्हा परिषदेकडे चार महिन्यापूर्वी गेलेला असताना आजपर्यंत काहीही कारवाई करण्यात आली नाही. जिल्हा परिषदेच्या पंचायत विभागाने कदम यांच्यावरील कारवाई थंड बस्त्यात टाकली असल्याने चौकशी अहवालच दाबण्यात आल्याची चर्चा होत आहे.**

# पोलीस अधिकारी अंमलदार सेवानिवृत्त

**नांदेड,दि.३० –** नांदेड पोलीस दलातील ६ पोलीस अधिकारी, ७ पो.उपनि, १५ अंमलदार आणि २ मंत्रालयीन कर्मचारी असे एकूण ३० अधिकारी व अंमलदार ३० जून रोजी नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त या सर्व सेवानिवृत्तांचा पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार, पो.उपअधिक्षक डॉ.अश्विनी जगताप यांनी पुष्पगुच्छ, शाल,श्रीफळ व भेटवस्तू देऊन सत्कार केला.

# नांदेड ते तिरुपती विशेष रेल्वे गाडीच्या १६ फेऱ्या



**नांदेड,दि.३० –** प्रवाशांची अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी, दक्षिण मध्य रेल्वे नांदेड ते तिरुपती दरम्यान खालीलप्रमाणे विशेष रेल्वे गाड्या चालवणार आहे. त्यानुसारनांदेड – तिरुपती १६.३० (शुक्र)१२.३० (शनि) ४जुलै ते २५जुलै ,तिरुपती नांदेड १४.२० (शनि)०९.३० (रवि) ५ जुलै ते २६ जुलै, नांदेड – तिरुपती १६.५० (शनि) १०.१० (रवि)५ जुलै ते २६ जुलै,तिरुपती नांदेड १६.४० (रवि) १३.१५ (सोम) ६जुलै ते २७ जुलै तसेच नांदेड – तिरुपती – नांदेड स्पेशल (०८ फेऱ्या

या विशेष रेल्वे गाड्या मुदखेड, धर्माबाद, बासर, निजामाबाद, कामारेड्डी, मेडचल, चेरलापल्ली, नलगोंडा, मिर्यालागुडा, नाडीकुडे, पिदुगुरल्ला, नेमलीपुरी, रोमपिचेर्ला, विनुकोंडा, डोनाकोंडा, मरकापुरम रोड, कुंबम, गिद्दलूर, दिगुवामेट्टा, नंदयाल, जम्मालामादुगु, येरागुंतला, कडप्पा, नांदलूर, रझाम्पेटा, कोदुरू आणि रेनिगुंटा या स्टेशन दोन्ही दिशांना थांबतील. या विशेष गाड्यांमध्ये २, ३, स्लीपर आणि सामान्य द्वितीय श्रेणीचे डबे असतील.

नांदेड तिरुपती नांदेड स्पेशल ८ फेऱ्या, या विशेष गाड्या मुदखेड, बासर, निजामाबाद, कामारेड्डी, मेडचल, मलकाजगिरी, काचीगुडा, उमदानगर, शादनगर, जेडचेरला, महबूबनगर, वानपर्थी रोड, गडवाल, कर्नुल सिटी, ढोण, गुत्ती, ताडीपत्री, येरागुंतला, कडप्पा, ओंतीमिटा, राझमपेटा, रेनिगुंटा या रेल्वे स्थानकांवर दोन्ही दिशांना थाबतील. या गाड्यांमध्ये १, २ , ३, स्लीपर आणि सामान्य द्वितीय श्रेणीचे डबे असतील. तिरुपतीस जाणाऱ्या भाविकांनी या विशेष रेल्वेगाड्यांचा लाभ घ्यावा असे रेल्वे विभागाने कळविले आहे.

# फ्लाईंग ऑफिसर जाधव यांचा छावाकडून सत्कार



**नांदेड,दि.३० :** मुदखेड तालुक्यातील वांगी येथील एका सामान्य शेतकरी कुटुंबातील अभिजीत विजयकुमार जाधव यांची गुणवत्ता आणि सातत्यपूर्ण परिश्रमाने इंडियन एअर फोर्सच्या फ्लाईंग ऑफिसर म्हणून नुकतीच निवड झाली आहे. छावा मराठा संघटनेतर्फे एका कार्यक्रमात त्यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लालबहादूर शास्त्री महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कमलाकर कनसे तर प्रमुख पाहुणे म्हणून छावा मराठा संघटनेचे प्रदेश अध्यक्ष इंजि. तानाजी हुस्सेकर यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमामागील भूमिका डॉ. प्रभाकर जाधव यांनी स्पष्ट केली. तर यशामागचे रहस्य अभिजीत जाधवने उलगडून सांगितले. यावेळी त्यांचा ग्रंथ देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास डॉ. स्वप्नील आढाव, दीपक पावडे, सुधाकर मुंगल, भास्कर थेटे, विवेक ताटे, अजय कदम, गणेश वडजे, विनोद महाजन, शिवाजी पाटील, प्रा. मेहेत्रे, सुहास गुट्टे, भुजंग बंडाळे, विजय शेळगावकर, गोपीनाथ हुस्सेकर, संजय वांगीकर, संजय हंबर्डे, पप्पू कदम, सर्वज्ञ, श्रवण आदींची उपस्थिती होती.

## कार्यालय देगलूर नगरपरिषद देगलूर, जि. नांदेड

फोन नं: (०२४६३) २५४६२४ ई–मेल: (02463) 254624 codegloor@gmail.com

विभाग : वसुली विभाग न.पा./जा.क्र.१५२७/२०२५ दि. ३०/०६/२०२५

### मालमत्ता करावर शास्ती माफीसाठी अभय योजना

### नागरिकांसाठी जाहीर आवाहन

नगरपालिका क्षेत्रामध्ये ब–याचदा मालमत्ता कराची थकबाकी रक्कम जास्त असणे मालमत्ता धारकांची अडचण असणे व इतर कारणांमुळे मालमत्ता कराचा भरणा केला जात नाही. मालमत्ता कराच्या थकीत रक्कमेवर महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ कलम १५० अ (१) २% प्रति महीना शास्ती आकारण्यात येत होती. यामुळे थकबाकीची रक्कम मोठ्या प्रमाणात वाढुन वसुलीवर विपरीत परिणाम होत आहे. यावर उपाय योजना म्हणुन दिनांक १९/०५/२०२५ रोजी महाराष्ट्र शासनाने निर्गमीत केलेल्या शासन निर्णयानुसार शास्ती माफ योजना देगलूर नगरपरिषद हद्दीत लागु करण्याचे नियोजीत होते. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ कलम १५० क नुसार मालमत्ता करावरील शास्ती अंशतः माफ करण्यासाठी मिळकतकराची पूर्ण रक्कम भरून विहीत नमुन्यात मालमत्ता धारक अर्ज सादर करू शकतील. योजनेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे असतील.

१) अभय योजना एक वेळेसच लागु असेल.
२) दिनांक १९/०५/२०२५ पर्यंतच्या थकीत मालमत्ता कराच्या रक्कमेवरील फक्त शास्तीस अभय योजना लागु असेल.
३) जे मिळकत धारक शास्ती वगळता इतर थकीत मालमत्ता कर पाणीपट्टी कर व न.प. हद्दीतील इतर सर्व मालमत्तांचे कर पूर्ण भरणा करतील केवळ त्यांचेच प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविण्यात येतील.
४) सदर योजनेचा लाभ देण्याकामी नगरपरिषदेकडे विहित मुद्दतीत/नमुन्यात अर्ज सादर करणे बंधनकारक असेल.
५) जे मिळकत धारक अभय योजनेचा लाभ घेऊ इच्छितात अशा मालमत्ता धारकांनी ५०% पर्यंत शास्ती सवलत मागणे करीता परिपुर्ण प्रस्ताव नगरपरिषदे कडे दि. ३१ जुलै २०२५ पुर्वी प्रस्ताव सादर करावा. प्रस्तावासोबत मागणी बिल, मालमत्ता कर / पाणीपट्टी कर / इतर कर भरल्याची पावती सोबत जोडावे.

सन २०२५–२०२६ चे मागणी बिल तयार होऊन वाटप प्रक्रिया चालु असुन ज्या मालमत्ता धारकांना मालमत्ता कर / पाणीपट्टी कर / इतर कर ची बिले अद्याप मिळाले नसतील त्यांनी कार्यालयातुन प्राप्त करून घ्यावी.

तरी सर्व जनतेस आवाहन करण्यात येते की, अभय योजनेचा लाभ घेणेकरीता लवकरात लवकर सर्व करांचा भरणा करावा व नगरपरिषदेस सहकार्य करावे.

स्वाक्षरित/–
**मुख्याधिकारी तथा प्रशासक**
**देगलूर नगर परिषद देगलूर**

# शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे यांचे स्वागत

**नांदेड, दि. ३० :** महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी व अधिकारी संघटनेच्या जिल्हाध्यक्षा विजया घिसेवाड यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाकडून नुतन शिक्षणाधिकारी (प्रा.) वंदना फुटाणे यांचे पुष्पगुच्छ देउन स्वागत करण्यात आले.

यावेळी संघटनेच्यावतीने निवड श्रेणी यादी प्रसिद्ध करणे, चट्टोपाध्याय वरिष्ट श्रेणी आदेश काढणे , दरमहा पाच तारखेच्या आत पेन्शन वितरीत करणे,सेवानिवृत्तांना ओळखपत्र देणे , अंशदान व उपदान भविष्य निर्वाह निधीच्या अंतिम रक्कमा त्वरीत अदा करणे याबाबत निवेदन देऊन चर्चा केली. यावेळी राज्य उपाध्यक्ष सुधिर गोडघासे ,राज्य संघटक बालाजी डफडे, जिल्हा चिटणीस रमेश गोवंदे,जिल्हा कार्याध्यक्ष एम.बी.शेख, धोपटे विश्वांभर, चिद्रावार जी.बी.,पारदे, शेख एफ.ए. यांची उपस्थिती होती .



कै.श्री.एल.एस.
रानवळकर
(गुरुजी)
यांच्या बाराव्या पुण्यस्मरणा निमित्त
विनम्र अभिवादन !

* शोकाकुल *
* श्रीमती मंगलाबाई लक्ष्मणराव रानवळकर (पत्नी)
* तुळशीराम संभाजी रानवळकर (भाऊ)
* नागोराव म्हैसाजी रानवळकर (भाऊ)
* नामदेवराव माणिकराव रानवळकर (भाऊ)
* गंगाधर माणिकराव रानवळकर (भाऊ)
* विजयकुमार माणिकराव रानवळकर (भाऊ)
* सौ. अर्चना बालाजी रानवळकर (सून-पुतन्या)
* सौ. सुषमा श्याम वासनीकर (मुलगी-जावई)
* सौ. शितल दिपक रानवळकर (सून-मुलगा)
* कु. प्राची लक्ष्मणराव रानवळकर (मुलगी)
* सुधाकर काशिराम रानवळकर (पुतण्या)
* सौ. समिक्षा दर्शन रानवळकर (सून-मुलगा)
* श्रीमयी (नात), शार्विल (नातू), चैतन्याश्री (नात), म्हाळसा (नात), श्री लक्षीत (नातू), ईश्वरी, श्री.